❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २५९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# OYO बुकिंगची नोंद ठेवणे बंधनकारक

## ओयो रुमबाबतचे नियम आणखी कडक करणार, चंद्रशेखर बावनकुळेंचे संकेत



■ नागपूर (दै. संध्या)

नागपूरमध्ये ओयो हॉटेल आणि रूम बुकिंग सेवांबाबत पोलिसांनी नवीन नियमावली तयार केली आहे. याबाबत नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली. पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी तयार केलेल्या नियमावलीचे त्यांनी स्वागत केले.

बावनकुळे म्हणाले की, ओयो हॉटेलमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या ग्राहकांची नोंद ठेवणे आवश्यक असेल. तसेच हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज किमान 90 दिवस जतन करावे लागणार आहे. नागपूरमध्ये अनेक हॉटेल्सवर ओयोचे बोर्ड लावलेले आहेत. त्यामुळे या हॉटेल्सची तपासणी करून ओयोची सेवा कोणत्या कारणासाठी वापरली जात आहे, याचीही पाहणी केली जाणार आहे. ओयो हॉटेल्सवर आता पोलिसांचे लक्ष राहणार असून, शहराची सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. ही नियमावली पुढे संपूर्ण महाराष्ट्रात लागू होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मुंबईकडे मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत. याबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व आंदोलकांना मुंबईतील कायदा-सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन केले.सणासुदीच्या काळात मुंबईत मोठे आंदोलन करणे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे आंदोलकांनी याचा विचार करावा, अशी विनंती त्यांनी केली. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकार सकारात्मकपणे काम करत आहे. ओबीसी किंवा मराठा समाजापैकी कोणाच्याही हक्कावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही सरकारकडून देण्यात आली आहे. मात्र, सरकारला यावर काम करण्यासाठी काही वेळ द्यावा, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यात अनेक भागांत दुष्काळाची परिस्थिती निर्माण होत असल्याने सरकारचे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मदत कशी पोहोचवता येईल, याबाबत सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आधार देणे आणि आत्महत्या रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर सरकारचे लक्ष आहे. याच पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.

## 'सुनील तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करतात': आमदार महेंद्र दळवींचा खळबळजनक आरोप

■ रायगड (दै. संध्या)



राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून शिंदे गट आणि अजित पवार गटात अंतर्गत वाद समोर येत आहेत. त्यातच आता थोरवे यांनी केलेल्या आरोपामुळे त्यात भर पडल्याचे दिसत आहे. यामुळे एकूणच महायुतीमध्ये सगळे काही आलबेल नसल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या आंदोलनावरून शिंदे गट आणि अजित पवार गटात जुंपली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी सुनील तटकरे यांच्यावर आरोप करत पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. आंदोलनकर्त्यांनी स्वतःची झोळी भरण्यासाठी केलेली स्टंटबाजी होती. हा प्रकार सगळ्यांच्या लवकरच लक्षात येईल, असे थोरवे यांनी म्हटले आहे. तसेच खालापूर येथील कंपन्यांना राष्ट्रवादी त्रास देण्याचे काम करत असल्याचा आरोपही थोरवे यांनी केला आहे. स्थानिकांना रोजगार देण्याचे काम कंपन्या करतात. मात्र अशा कंपन्या कोणी बंद पाडण्याचा विचार करत असेल तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल. असा इशारा थोरवे यांनी दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून रायगडच्या पालकमंत्रीपदावरून मंत्री भरत गोगावले आणि मंत्री अदिती तटकरे यांच्यात मोठी रस्सीखेच सुरू होती. मात्र, विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने राष्ट्रवादीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांना सहकार्य करत स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. यामुळे अनिकेत तटकरे यांची निवड बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला. या राजकीय तडजोडीनंतर रायगडच्या पालकमंत्रीपदाची माळ अखेर भरत गोगावले यांच्या गळ्यात पडली.

या राजकीय घडामोडींनंतर आमदार महेंद्र दळवी यांनी अनिकेत तटकरे यांच्यावर अत्यंत शेलक्या शब्दांत निशाणा साधला. दळवी यांनी अनिकेत तटकरे यांचा उल्लेख 'सरोगसी बाळ' असा करत त्यांच्यावर सडकून टीका केली. तसेच, विधानपरिषद निवडणुकीत जर आम्ही आमचा उमेदवारी अर्ज मागे घेतला नसता, तर तटकरे यांचा राजकीय जन्म झालाच नसता, असा घणाघातही दळवी यांनी यावेळी केला.

## थोडक्यात...

### कॉंग्रेसचे रत्नाकर महाजन यांचं पुण्यात निधन

पुणे : दैनिक संध्या

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी प्रवक्ते रत्नाकर महाजन यांचे निधन झाले आहे. त्यांनी शनिवारी सकाळी अखेरचा श्वास घेतला. पुण्यातील राहत्या घरी रत्नाकर महाजन यांचे निधन झाले. ते 80 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. अखेर शनिवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. शनिवारी दुपारी एक वाजता पुण्याच्या नवी पेठेतील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. रत्नाकर महाजन यांच्या जाण्याने कॉंग्रेसचा अभ्यासू, संयमी आणि निष्ठावंत नेता हरपला आहे. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात कॉंग्रेसची पिछेहाट होत असताना पक्षाची बाजू प्रभावीपणे आणि जोरसकपणे लावून धरण्याची जबाबदारी रत्नाकर महाजन यांनी योग्यपणे पार पाडली. अलीकडे राजकारणाचा स्तर घसरत असताना प्रवक्ते म्हणून रत्नाकर महाजन यांची अभ्यासपूर्ण मांडणी, आक्रस्ताळेपणा किंवा अपशब्द न वापरता समोरच्याला आपली बाजू पटवून देणे आणि राजकीय नैतिकता या गुणांची अधिकच प्रकर्षाने जाणीव होते.

### पुण्यात गणेश मूर्ती खरेदीमुळे वाहतूक बदल

पुणे : दैनिक संध्या

पुण्यात प्राणप्रतिष्ठापना सोहळा आणि गणेश मूर्ती खरेदीमुळे वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. शिवाजीनगरमधील डेंगळे पूल परिसर, मध्य भागातील छत्रपती शिवाजी रस्ता, सारसबाग आणि मुंढव्यातील केशवनगर परिसरात हे बदल लागू होतील. शिवाजीनगर येथील डेंगळे पूल परिसरात गणेशमूर्ती विक्रेत्यांनी स्टॉल लावले आहेत. त्यामुळे या भागातील वाहतूक व्यवस्थेत रविवार, 13 सप्टेंबर आणि सोमवार, 14 सप्टेंबर रोजी बदल केले जातील. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यामुळे छत्रपती शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा चौक ते मंडईतील गोटीराम भैय्या चौक हा मार्ग वाहतुकीसाठी बंद राहील. वाहनांनी संताजी घोरपडे पथ, कुंभारवेस चौक आणि मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौक या मार्गाने जावे. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी पुतळा चौक आणि खुडे चौकमार्गे कुंभारवाड्याकडे जाणाऱ्या वाहनांनी छत्रपती शिवाजी पुलावरून डावीकडे वळून संताजी घोरपडे मार्गाने कुंभारवेसकडे जावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सारसबाग परिसरातील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा चौक ते समाधना भेळ केंद्र परिसरात सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई केली आहे. वाहनचालकांनी मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा आणि नीलायम चित्रपटगृहाजवळ वाहने पार्क करावीत. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी वाहनचालकांना या बदलांची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे.

## नवी दिल्लीत मोदी, पुतीन आणि शी जिनपिंग एकत्र, ट्रम्प यांच्याकडून मोठ्या निर्णयाचे संकेत

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



ब्रिक्स समिटच्या निमित्तानं भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग नवी दिल्लीत आहेत. दुसरीकडे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठ्या निर्णयाचे संकेत दिले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. अमेरिका आणि कॅनडामध्ये लवकरच व्यापार करार होईल, असं ट्रम्प म्हणाले. टॅरिफच्या मुद्यावरुन अमेरिका आणि कॅनडामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून तणाव होता. ट्रम्प यांच्या घोषणेनं अमेरिका आणि कॅनडातील तणाव कमी होणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान मिशेल मार्टिन यांची आयरलँडमध्ये भेट झाली. या भेटीवेळी त्यांना कॅनडासोबतच्या व्यापार कराराबाबत विचारण्यात आलं. यावेळी ट्रम्प म्हणाले की कॅनडाला अमेरिकेसोबत करार करायचा आहे. लवकरच दोन्ही देशांमध्ये करार झालेला पाहायला मिळेल. अमेरिकेच्या शेतकऱ्यांसाठी चांगल्या व्यापारी अटींची मागणी केली आहे. कॅनडाला अमेरिकन शेतकऱ्यांवर लादलेलं टॅरिफ आणि दुसरं शुल्क हटवावं लागेल.

अमेरिका आणि कॅनडा यांच्यात दीर्घ काळापासून तणाव सुरु आहे. मात्र, हा वाद फक्त टॅरिफ पुरता मर्यादित राहिलेला नाही. दोन्ही देशांमधील वाढत्या तणावामुळं ऑटोमोबइल सारख्या उद्योगांच्या सप्लाय चेनवर परिणाम झाला होता. ऑगस्टमध्ये दोन्ही देशांमध्ये झालेली व्यापार कराराबाबतची चर्चा अपयशी ठरली होती. ज्यानंतर अमेरिकेनं कॅनडावर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला होता. याला प्रत्युत्तर म्हणून कॅनडानं अमेरिकन वस्तू आणि स्टील उत्पादनांवर टॅरिफ लादलं. यानंतर दोन्ही देशांनी एकमेकांविरोधात पावलं उचलली त्यातून व्यापारी तणाव वाढला होता. भारतात ब्रिक्स समिट सुरु असताना डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या वक्तव्यानं पुन्हा एकदा कॅनडा आणि अमेरिकेतील व्यापार कराराची शक्यता वाढली आहे.

## एमपीएससी पेपरफुटीत सरकारच्या जवळच्या लोकांचा संबंध, रोहित पवारांचा धक्कादायक आरोप

■ मुंबई (दै. संध्या)



राज्य लोकसेवा आयोगाच्या पेपर फुटी प्रकरणात सरकारच्या जवळच्या लोकांचा संबंध जाणवतो, असा धक्कादायक आरोप राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला. पैशाला महत्त्व देऊनच पेपरफुटी करणाऱ्यांना वाचवले जात आहे. आतापर्यंत 15 पेपर फुटले, विद्यार्थ्यांच्या भावनांचा सरकारला काही देणेघेणे नाही. पैसे देऊन आमदार फोडा खासदार पुढे आणि जनतेला वाऱ्यावर सोडा, अशी सध्याची स्थिती आहे. आज शेतकरी आणि मजुरांची ही वाईट परिस्थिती. त्यांची मुलंच स्पर्धा परीक्षेची तयारी करतात, याकडे सरकारचे लक्ष नसल्याचे रोहित पवार म्हणाले. पुण्यामध्ये एमपीएससीची तयारी करणाऱ्या प्रथमेश देशमुखने आत्महत्या केल्याने त्याच्या कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी रोहित पवार धाराशिवच्या परंडा तालुक्यातील खासापुरीत आले होते. यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

तत्पूर्वी एमपीएससीच्या परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांविरोधात छत्रपती संभाजीनगरात विद्यार्थी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं. पेपरफुटी प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांनी राजीनामा द्यावा, माजी अध्यक्ष आणि सचिवांच्या कारभाराची चौकशी व्हावी, परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या या मोर्चातून करण्यात आल्या आहेत.

दरम्यान एमपीएससी सचिवांच्या तोंडाला काळं फासल्याप्रकरणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी देखील प्रतिक्रिया दिली. संबंधितांवर कारवाई करणार असल्याचं योगेश कदम यांनी म्हटले. तसेच एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात शिक्षणमंत्र्यांना दोष देणे चुकीचं आहे. एमपीएससी स्वतंत्र संस्था आहे, यात शिक्षणमंत्र्यांचा संबंध नाही, असं म्हणत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शिक्षणमंत्र्यांची पाठराखण केली आहे.

# मनोज जरांगेंचा एल्गार, 15 सप्टेंबरला मुंबईकडे कूच करणार

## *पाटोदा-खोपोलीमार्गे थेट आझाद मैदानात आमरण उपोषण; मार्ग जाहीर करताना जरांगे भावुक*

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आणि सगेसोयरे तसेच कुणबी प्रमाणपत्रांच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा 'चलो मुंबई'चा नारा दिला आहे. आपल्या आमरण उपोषणाच्या 15व्या दिवशी अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत त्यांनी मुंबईला जाण्याचा सविस्तर मार्ग, मुक्काम आणि आंदोलनाची संपूर्ण रणनीती जाहीर केली. "ही मराठ्यांची अंतिम आणि निर्णायक लढाई असून, आपण शांततेच्या मार्गाने मुंबईत जाऊन जिंकूनच माघारी येणार आहोत," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबईत गेल्यावर मराठा महिलांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे यांच्या घरी हळदी-कुंकवासाठी जावे, असे आवाहन जरांगे यांनी केले. "हळदी-कुंकू लावताना त्यांना सांगा की, साहेबांना सांगा आम्हाला आरक्षण द्या. त्या जर बाहेर आल्या नाहीत तर जगभरात ब्रेकिंग न्यूज होईल आणि जर आल्या, तर सौभाग्याच्या लेण्याची इज्जत म्हणून त्या स्वतः नवऱ्याला आरक्षण द्यायला सांगतील. यामुळे सरकारची मोठी पंचायत होईल," असा राजकीय टोला त्यांनी लगावला.

जे नोकरदार, व्यावसायिक आणि शेतकरी मुंबईला येऊ शकत नाहीत, त्यांनी आंदोलकांच्या



मार्गावर सहकुटुंब उभे राहून त्यांना आशीर्वाद द्यावा आणि मुंबईला जाण्यासाठी निरोप द्यावा. तसेच, ज्यांच्याकडे चारचाकी गाड्या आहेत, त्यांनी आंदोलकांना मुंबईच्या वेशीपर्यंत सोडून माघारी यावे. "तुमचे काही हजार रुपयांचे डिझेल समाजाच्या लेकरांचे आयुष्य घडवेल," अशी भावनिक साद त्यांनी घातली.

सर्व वाहनांनी एकाच रांगेत चालायचे असून एकमेकांना ओव्हरटेक करायचे नाही. सोबत केवळ पीठ, भाकरी, अंथरूण-पांघरुण घ्यायचे आहे; काठ्या किंवा कोणतीही शस्त्रे अजिबात घ्यायची नाहीत. "न्यायदेवतेवर आपला विश्वास आहे, त्यामुळे न्यायदेवतेचा सन्मान राखण्यासाठी आंदोलन अत्यंत शांततेत करायचे आहे. कोणीही दगडफेक किंवा जाळपोळ करायची नाही," अशी सक्त ताकीद त्यांनी दिली.

वाटेत पोलिसांनी बॅरिकेड्स लावून रस्ता अडवल्यास ते ढकलायचे नाहीत. त्याऐवजी थेट डांबरी रस्त्यावर ठाण मांडून बसायचे आणि पोलिसांना हात जोडून जाण्याची विनंती करायची. "देवेंद्र फडणवीस पोलिसांना मराठ्यांना अडवायला सांगणार नाहीत, कारण त्यांना मराठ्यांच्या रोषाची आणि मतांच्या ताकदीची जाणीव आहे," असा दावाही जरांगे यांनी केला.

हैदराबाद गॅझेट आणि शपथपत्राच्या आधारावर कुणबी प्रमाणपत्र दिले जाणार नाही, या चर्चेवर जरांगे यांनी संताप व्यक्त केला. ५८ लाख नोंदी सापडूनही प्रमाणपत्रे वाटली न गेल्याने शासनाने सुरू केलेल्या कॅम्पमधून मराठ्यांना शपथपत्रावर प्रमाणपत्रे मिळालीच पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली.

### मुंबईला जाण्याचा 5 दिवसांचा मार्ग

- 15 सप्टेंबर पहिला मुक्काम : पाटोदा (जि. बीड) - अंतरवाली, शहागड, गेवराई, बीड, मांजरसुंबा, लिंबागणेश मार्गे.
- 16 सप्टैंबर, दुसरा मुक्काम: श्रीगोंदा (जि. अहिल्यानगर/अहमदनगर)
- 17 सप्टेंबर, तिसरा मुक्काम: हडपसर (पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसर)
- 18 सप्टेंबर चौथा मुक्काम: खोपोली (किंवा कोपरखैरणे, नवी मुंबई)
- 19 सप्टेंबर पाचवा मुक्काम : सकाळी १० वाजता मुंबईतील आझाद मैदानावर धडक आणि तिथेच बेमुदत आमरण उपोषण सुरू होणार

## सोन्या चांदीच्या दरात अचानक मोठी घसरण

■ मुंबई (दै. संध्या)

सोन्या चांदीची खरेदी करणाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोन्या चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं सोने चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी ही मोठी संधी आहे. गेल्या काही दिवसापासून सोन्या चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत होती. त्यामुळं ग्राहकांच्या खिशाला झळ लागत होती. अशातच आज सोन्या चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे.

आज, 12 सप्टेंबर 2026 सोने आणि चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा दिवस आहे. आज सराफा बाजारात सोन्याच्या दरात 2700 आणि चांदीच्या दरात 10 हजार रुपयांची लक्षणीय घसरण झाली. देशभरातील विविध शहरांमध्ये सोन्या-चांदीचे नवीन दर आता जाहीर झाले आहेत.

आज, 24 कॅरेट सोन्याचा भाव प्रति 10 ग्रॅम 1 लाख 55 हजार 900 रुपये आहे. तर 22-कॅरेट सोन्याचा भाव प्रति 10 ग्रॅम सुमारे 1.42 लाख आहे. वेगवेगळ्या शहरांतील स्थानिक बाजारपेठेनुसार दरांमध्ये बदल होतो.

सोन्यासोबतच, गेल्या काही दिवसांत चांदीच्या दरातही लक्षणीय चढ-उतार दिसून आले आहेत. काल जो भाव 2 लाख 44 हजार 600 रुपये प्रति किलोग्राम होता, तो आज बदलला आहे. 12 सप्टेंबर रोजी, भारतात चांदीचा भाव प्रति किलोग्राम 10 हजार ने घसरून 3 लाख 34 हजार 600 प्रति किलोग्राम झाला.

# संपादकीय

## एमपीएससीची पेपरफुटी

महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा म्हणजे लाखो विद्यार्थ्यांच्या वर्षानुवर्षाच्या मेहनतीचा, त्यागाचा आणि सरकारी सेवेत जाण्याच्या स्वप्नांचा मार्ग असला तरी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षामधील पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकाराच्या आरोपानी या व्यवस्थेवरील विश्वासाला मोठा धक्का बसलेला आहे. वास्तविक लोकसेवा आयोग ही महाराष्ट्र राज्यातील एक महत्त्वाची आणि प्रतिष्ठीत संवैधानिक संस्था आहे. राज्य शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेसाठी गुणवान आणि गुणवंत अधिकारी निवडण्याचे काम ही संस्था करते. ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो तरुण पारदर्शक आणि निष्पक्ष परीक्षेच्या अपेक्षेने या परीक्षेची तयारी करतात. भूतकाळात एमपीएससीने आपल्या स्वायत्ततेमुळे आणि कडक नियमावलीमुळे एक उच्च प्रतिष्ठा निर्माण केलेली होती. मात्र अलीकडच्या काळात पेपरफुटीमुळे आयोग वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. असे गैरप्रकार अलीकडचे आहेत असे नाही. कित्येक वर्षापासून गैरप्रकार अधूनमधून उघडकीस येतच होते. त्या त्या काळातील सरकारने त्या प्रकाराकडे गंभीरपणे लक्ष न दिल्यामुळे आयोगातील काही अधिकारी आणि सेवक सोकावत गेले. हा सगळा भ्रष्टाचार पाहून सरकारी नोकरीच्या आशेने दिवसरात्र मेहनत घेणाऱ्या विद्यार्थीच्या पदरी नैराश्य आले. त्यामुळे काही विद्यार्थीनी आत्महत्येचा मार्ग स्विकारला. यामुळे त्यांचे पालकही हताश होताना दिसत आहे.अलीकडच्य कालावधीत औषध निरीक्षक भरतीच्या प्रश्नपत्रिका फुटीनंतर विद्यार्थ्यांचा संताप रस्त्यावर आला पुणे. कोल्हापूर. औरगाबाद. नागपूर नाशिक ठिकाणी तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पारदर्शी चौकशी व दोषीवर कठोर कारवाई आणि या आयोगाच्या दैनंदिन कामाच्या पध्दतीत बदल व सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली. या सगळ्यातून विद्यार्थीचा आक्रोश नाकारता येणार नाही. प्रश्न त्यांच्या भविष्याचा आहे. एखादा विद्यार्थी, वर्षेनुवर्षे अभ्यास करतो. तो आणि त्याचे शेतकरी. मजुरी करणारे पालक आर्थिक व मानसिक संघर्ष सहन करतो. आणि पेपरफुटीमुळे त्यांची संधी हिरावली जाते. तेव्हा त्यांना होणारा संताप स्वाभाविक आहे. त्यामुळे या संवेदनशील विषयावर राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करणे आवश्यक आहे. या विद्यार्थीच्या भावना तीव्र असून सत्ताधारी व विरोधात असणारे मंडळीनी यावर सकारात्मकता दाखवली पाहिजे. सरकारने व त्यांच्या मित्रपक्षानी त्यांच्या वाचाळवीर मंडळीना आवरण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर त्यांचे म्हणणे ऐकायची मानसिकता ठेवण्यासाठी तयार राहीले पाहीजे. विद्यार्थ्यांच्या व्यासपीठावर परीक्षा व्यवस्थेतील दोषावर चर्चा होण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहेत. अन्यथा या गरजवंत विद्यार्थ्यांचा खरा प्रश्न राजकारणाच्या गदारोळात हरवण्याची भिती व्यक्त करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. या घटनेनंतर सरकारने २०२५ मधील गट ब व गट क च्या परीक्षाबाबत एस आय टी चौकशी जाहीर केलेली आहे. परीक्षा प्रक्रियेत सुधारणा आणि तक्रारीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जनमाणसात आपला विश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. या पेपरफुटी प्रकरणात दोषीवर कारवाई झाली तरच व आयोगाच्या कामाच्या पध्दतीत ठोस बदल झाले तरच विद्यार्थ्यांच्या मनातील संशयाचे निराकरण होईल. व मनातील संशय दूर होईल. लोकसेवा आयोगाची परीक्षा ही प्रश्नपत्रिका. व उत्तरपत्रिका नसून राज्याच्या कुशल प्रशासनासाठी योग्य. प्रामाणिक. निस्पह कार्यक्षम मनुष्यबळ निवडण्याचे जबाबदारीचे शिवधनुष्य आहे.पेपरफूटी विरोधात होत असलेला विद्यार्थ्यांचा लढा यशस्वी करण्यासाठी सरकारने याकडे गलीच्छ तोडफोडीच्या राजकारणाचा व शिवराळपणाच्या चर्चा बंद करून आयोगाच्या प्रश्नपत्रिका तयार होण्याच्या प्रक्रियेपासून ते परीक्षा केंद्राच्या ठिकाणी प्रामाणिकपणे काम केले पाहिजे तरच महाराष्ट्रातील जनतेचा एमपीएससीवर विश्वास बसेल.

## काँक्रीट दिन व अभियंता दिन सोहळ्यानिमित्त आयोजित प्रदर्शनाचा शुभारंभ



■ पुणे (दै. संध्या)

राष्ट्रीय काँक्रीट दिन व अभियंता दिनानिमित्त आयोजित दोन दिवसीय प्रदर्शन आणि सोहळा २०२६ चा आज अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (APCOER), पर्वती, पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या दोन दिवसीय भव्य कार्यक्रमास ३,००० हून अधिक विद्यार्थी, व्यावसायिक अभियंते, उद्योग प्रतिनिधी, प्रदर्शक, प्रायोजक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या वर्षीच्या सोहळ्याची "काँक्रीटमधील नवकल्पनांच्या माध्यमातून शाश्वत भारताची उभारणी" संकल्पना आहे असून या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभास श्रीमती प्रमिला गायकवाड, सरचिटणीस, ABMSP, पुणे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच डॉ. हनुमंत धुमाळ, कार्यकारी संचालक, MKVDC, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, डॉ. सौ. सुषमा कुलकर्णी, Principal Advisor, MIT-WPU, श्री. धैर्यशील वांडेकर, खजिनदार, ABMSP, पुणे, अँड. भगवानराव साळुंखे, खजिनदार, ABMSP, पुणे, श्री. प्रदीप वाल्हेकर, अध्यक्ष, पुणे RMC असोसिएशन, अभियंता युसूफ ए. एस. इनामदार, प्रमुख संयोजक, राष्ट्रीय काँक्रीट दिन कार्यक्रम डॉ. सचिन काटे, सचिव, पुणे RMC असोसिएशन तसेच ICI, IGS, MBVA आणि इतर अनेक व्यावसायिक, शैक्षणिक व उद्योग संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. काँक्रीटची गरज पाहता ग्रीन काँक्रीट सह विविध काँक्रीटच्या प्रात्यक्षितचा अनुभव विध्यार्थ्यांना भेटावं याच उद्देशाने या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या वेळी प्रोजेक्टची स्पर्धा ही आयोजित घेण्यात आली आहे . इंगीनीरिंग करीत असेलेल्या विध्यार्थ्यांच्या कौशल्यास वाव मिळावे म्हणून या परिषदेचे उद्देश आहे.

सरकार, शिक्षण क्षेत्र, व्यावसायिक संस्था आणि बांधकाम उद्योगातील मान्यवरांची उपस्थिती ही काँक्रीट तंत्रज्ञान, शाश्वत बांधकाम आणि भारताच्या पायाभूत विकासासाठी सर्व संबंधित घटकांना एका व्यासपीठावर आणण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. कार्यक्रमामध्ये विविध तांत्रिक स्पर्धा, तांत्रिक परिसंवाद, ज्ञानविनिमय सत्रे आणि उद्योग-विद्यार्थी संवाद आयोजित करण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष उद्योगातील तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि नव्या संधींची माहिती मिळत आहे. काँक्रीट तंत्रज्ञान, बांधकाम, पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग आणि सुरक्षितता यांसारख्या आधुनिक विषयांवरही या कार्यक्रमातून मार्गदर्शन केले आहे. उद्घाटन समारंभानंतर मान्यवरांच्या हस्ते Construction & Infrastructure Exhibition चे प्रदर्शनस्थळी फित कापून औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

### ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे ३,००० हून अधिक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा सहभाग. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, अभियंते, तंत्रज्ञान कंपन्या आणि वरिष्ठ व्यावसायिकांशी थेट संवाद साधण्याची संधी या माध्यमातून मिळाली आहे.

या भव्य प्रदर्शनामध्ये भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्या सहभागी झाल्या असून, बांधकाम व पायाभूत सुविधा क्षेत्रातील अत्याधुनिक उत्पादने, यंत्रसामग्री, उपकरणे, तंत्रज्ञान आणि विविध नाविन्यपूर्ण उपाययोजनांचे प्रदर्शन करण्यात येत आहे. प्रदर्शनामध्ये विशेषतः : रेडी-मिक्स काँक्रीट व काँक्रीट तंत्रज्ञान बांधकाम यंत्रसामग्री व उपकरणे काँक्रीट पंप व बॅचिंग सोल्युशन्स बांधकाम रसायने विद्युत व अत्याधुनिक बांधकाम उपकरणे शाश्वत बांधकाम तंत्रज्ञान संरचनात्मक अभियांत्रिकी व सुरक्षितता विनाशविरहित चाचणी (NDT) डिजिटल बांधकाम व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान पायाभूत सुविधा विकासासाठी उपाययोजना यांसह विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानांचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहभागामुळे हे प्रदर्शन उद्योग-शिक्षण-व्यावसायिक क्षेत्रातील संवाद, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि नवीन व्यावसायिक संधी निर्माण करणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. सरकार, उद्योग, शिक्षण आणि अभियंता क्षेत्र एकाच व्यासपीठावर राष्ट्रीय काँक्रीट दिन व अभियंता दिन सोहळा २०२६ चा मुख्य उद्देश शासकीय यंत्रणा, अभियंते, RMC उत्पादक, कंत्राटदार, विकासक, वास्तुविशारद, सल्लागार, उत्पादक, तंत्रज्ञान कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थी यांना एकत्र आणून ज्ञान, तंत्रज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. भारताच्या वेगाने विकसित होत असलेल्या पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी शाश्वत, गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि तंत्रज्ञानाधारित बांधकाम पद्धतींची गरज लक्षात घेऊन या कार्यक्रमामध्ये नवकल्पना, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. आयोजकांच्या मते, राष्ट्रीय काँक्रीट दिन हा केवळ एक उत्सव नसून, भारताच्या पायाभूत विकासासाठी अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत बांधकाम परिसंस्था निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. राष्ट्रीय काँक्रीट दिन व अभियंता दिन सोहळा २०२६ हा कार्यक्रम ११ सप्टेंबर २०२६ रोजीही सुरू राहणार असून, तांत्रिक सत्रे, विद्यार्थ्यांच्या स्पर्धा, प्रदर्शन, उद्योग संवाद, पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

## गोळीबार करणारे पाच रेकॉर्डवरील गुन्हेगार जेरबंद



■ पुणे (दै. संध्या)

■ शरद झिने यांच्या नेतृत्वाखाली आंबेगाव पोलिसांची धडाकेबाज कारवाई

■ तीन गावठी पिस्तूलांसह चार जिवंत काडतुसे जप्त

जुन्या भांडणाच्या वादातून तरुणावर गावठी पिस्तूलने दोन राउंड गोळीबार करून पसार झालेल्या पाच रेकॉर्डवरील गुन्हेगारांना आंबेगाव पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले. आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ही धडाकेबाज कारवाई केली. आरोपींकडून तीन गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री साडेएकच्या सुमारास भेंडी चौक, आंबेगाव (बु.), पुणे येथील हरणाई कॉम्प्लेक्सच्या पार्किंगमध्ये फिर्यादीचा मुलगा गाडी पार्क करून घरी जात असताना आरोपींनी त्याला जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ केली. त्यानंतर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपींनी गावठी पिस्तूलमधून त्याच्या दिशेने दोन राउंड फायर केले आणि पिस्तूल घेऊन घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेप्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३८०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, आर्म्स ॲक्ट, महाराष्ट्र पोलीस कायदा आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे करीत आहेत.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी तपास पथकाला आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना देत तपासाची सूत्रे प्रभावीपणे हाताळली. पथकाने आरोपींच्या हालचालींबाबत गोपनीय माहिती संकलित केली. तसेच त्यांच्या मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा माग काढण्यात आला.

तपासादरम्यान आरोपी दख्खन हॉटेललगत, जांभुळवाडी, पुणे येथे पिस्तूल व जिवंत काडतुसे घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून पाचही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून तीन गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

या प्रकरणात शिवदत्त ऊर्फ सोन्या हरीकाका कोंढरे (२३), श्रेयश रुपेश काटे (२३), सुरज सुभाष डिंबळे (२३), अतिष उमेश मोरे (२८) आणि ऋत्विक ऊर्फ दगडू पांडुरंग बेलदरे (२४) यांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना १४ सप्टेंबर २०२६पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## टीपी व डीपी, एम. आर.टीपी ऍक्ट नुसार होत आहे का(?) याचा मागोवा घेणाऱ्या परिसंवादाचे आयोजन



■ पुणे (दै. संध्या)

जागतिक शहरांशी स्पर्धा करणाऱ्या पुणे शहराचे शहरीकरण अस्ताव्यस्त आणि विकास नियोजन शून्य झाला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक प्राथमिक गरजांसाठी आजही झगडत आहे. दिवसेंदिवस या समस्या अधिकच वाढत आहे. दिशाहीन नियोजनामुळे हे शहर बकाल झाले असून वेळीच यासंदर्भात उपाययोजना केल्या नाहीत तर हे शहर राहण्यायोग्यही असणार नाही, आणि यासाठी पुढील पिढी मात्र आपल्याला माफ करणार नाही अशी भावना वास्तु विशारद, नगर रचनाकार आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली.

पुणे महानगराचा विकास सुनियोजित पद्धतीने आणि नगर नियोजन विभागाच्या निर्देशानुसार, टीपी व डीपी नुसार होत आहे का(?) याचा मागोवा घेणाऱ्या परिसंवादाचे आयोजन 'राजीव गांधी स्मारक समितीच्या' वतीने करण्यात आले.

यामध्ये तज्ज्ञांनी पुणे शहराच्या विकासासंदर्भात भूमिका मांडली. या परिसंवादामध्ये माजी खासदार अँड. वंदना चव्हाण, माजी महापालिका आयुक्त महेश झगडे, माजी महापौर, काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष (पूर्व विभाग) प्रशांत जगताप, शिवसेना उबाठा गटानेते नितीन गावडे ,पर्यावरण तज्ज्ञ सारंग यादवाडकर, सीओइपी'चे माजी प्रा. प्रताप रावळ, वास्तु विशारद मकरंद शेंडे, संग्राम खोपडे, पर्यावरण तज्ज्ञ प्राजक्ता दिवेकर, वास्तु विशारद शिरीष केंभावी, सहकारी गृहनिर्माण सोसायटी महासंघाचे सुहास पटवर्धन आदि सहभागी झाले होते. राजीव गांधी स्मारक समितीचे अध्यक्ष गोपाळदादा तिवारी यांच्यासह समितीचे सदस्य ही उपस्थित होते.

अँड. वंदना चव्हाण म्हणाल्या , पुणे शहरावर अगोदरच शहरीकरणामुळे मोठ्या समस्यांचा बोजा आहे, त्यावर लोकसंख्या वाढीमुळे अधिक नागरी समस्या दररोज निर्माण होत आहेत. यासंदर्भात मी मुख्यमंत्री आणि संबंधित विभागांशी अनेक वेळा पत्र व्यवहार केला परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अशाच लोकांमुळे उद्या जर हे शहर राहण्यासाठीही योग्य नसेल तर उद्याची पिढी आपल्याला माफ करणार नाही. माजी आयुक्त महेश झगडे म्हणाले, पी एम आर डी एम क्षेत्रामध्ये बेसुमार बांधकाम परवानगी, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर झालेली बांधकामे आणि वाढलेली लोकसंख्या यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी, रस्ते, स्वच्छता या संदर्भात नागरिक समस्या वाढल्या आहेत.

याला जबाबदार नगर विकास सचिव आणि महापालिका आयुक्त आहेत याचा जबाब नागरिकांनी त्यांना विचारणे गरजेचे आहे. प्राजक्ता दिवेकर म्हणाल्या, वेताळ टेकडीवर येत्या काही वर्षांमध्ये तीन मोठे वाहतुकीचे प्रकल्प येणार आहेत.

## आत्महत्या प्रतिबंधक गेटकीपर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH), पुणे यांच्या वतीने जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन २०२६ निमित्त एक दिवसीय आत्महत्या प्रतिबंधक गेटकीपर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मानसिक आरोग्य, आत्महत्येची प्रवृत्ती आणि आत्महत्या प्रतिबंध याबाबत जनजागृती वाढविणे, तसेच मानसिक तणाव व भावनिक अडचणी ओळखून योग्य वेळी मदत मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकणाऱ्या व्यक्तींची क्षमता विकसित करणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. प्रसाद देशपांडे, संचालक-प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH) यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. श्रीकांत पवार, मुख्य प्रशासकीय अधिकारी, संस्थेतील प्राध्यापकवर्ग तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजक डॉ. प्रफुल्ल कापसे यांनी प्रमुख प्रशिक्षक श्री. सचिन चितांबरन, संस्थापक संचालक, The Connect Hut – मानसिक आरोग्य विषय सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा पद्धतीने मांडण्यासाठी कार्यरत सामाजिक उपक्रम – यांचा परिचय करून दिला.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे १९० सहभागी उपस्थित राहिले. प्रशिक्षणादरम्यान मानसिक आरोग्य, भावनिक तणाव, आत्महत्येशी संबंधित बाबी तसेच आत्महत्या प्रतिबंधामध्ये गेटकीपर म्हणून निभावता येणारी भूमिका याबाबत सहभागींचे ज्ञान व कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात आला.



## प्रा. हिमकुमार चॅटर्जी यांच्या हस्ते डॉ. सुधाकर चव्हाण यांना पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)

कुठलीही संस्था किंवा विद्यापीठ हे तेथील इमारतींमुळे नव्हे, तर शिक्षकांमुळे आणि त्यांनी घडविलेल्या विद्यार्थ्यांमुळे नावलौकिक मिळवत असते. कुठल्याही विषयाची संकल्पना समजावून, अनुभवून देण्याचे कौशल्य हे केवळ शिक्षकांमध्ये असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयला नव्हे, तर शिक्षकांना प्रश्न विचारायला हवेत, असे प्रतिपादन प्रसिद्ध भित्तिचित्रकार तथा मुंबईतील प्रतिष्ठित 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाईन' या अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हिमकुमार चॅटर्जी यांनी केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे, तर्फे आयोजित 'विश्वारंभ कला पुरस्कार' सोहळ्याप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी हजारो कलाशिक्षकांना घडविणारा शिल्पकार अशी ओळख असणारे वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा प्रख्यात दृश्यकलाकार डॉ. सुधाकर चव्हाण यांना दृश्यकलेतील अनन्यसाधारण योगदानाबद्दल प्रतिष्ठित 'विश्वारंभ कला पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे चिरंजीव श्री. अमित चव्हाण यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी माईर्स एमआयटी एडीटी समूहाच्या कार्यकारी संचालक सौ.ज्योती कराड-ढाकणे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, एमआयटी स्कूल ऑफ फाइन आर्ट्सचे अधिष्ठाता डॉ. गणेश तरतरे आदी उपस्थित होते.चॅटर्जी पुढे म्हणाले, "कलाकृती ही कलाकारापेक्षा अधिक आयुष्य घेऊन जन्माला येते. त्यामुळे कलाकाराने केवळ व्यवहारावर भर न देता योगदानावर भर द्यावा.




RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## शिवसेना पर्यावरण विभाग पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी पद्मा फाउंडेशनचे कांबळे यांची निवड

**पुणे : दैनिक संध्या**

पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांची शिवसेना पर्यावरण विभाग, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन तसेच पर्यावरण विषयक जनजागृतीच्या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या हस्ते शशिकांत कांबळे यांना या निवडीचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी माजी खासदार आनंद परांजपे, मध्यवर्ती कार्यालयन सचिव प्रशांत पालांडे, सागर पानसरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पश्चिम महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प शशिकांत कांबळे यांनी व्यक्त केला. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून, वृक्षसंवर्धन आणि निसर्गरक्षणासाठी शिवसेनेच्या माध्यमातून व्यापक जनआंदोलन उभे करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अकारा २०२६ मध्ये साई लक्ष्मी आणि राघव चव्हाण सुवर्णविजेते

**पुणे : दैनिक संध्या**

अकारा २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील आर्किटेक्चरल रूकीज् स्पर्धेत सी. साई लक्ष्मी आणि राघव चव्हाण यांनी सुवर्ण पारितोषिक पटकावले. पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पिरंगुट येथे झालेल्या या स्पर्धेत भारतातील सहा राज्यांतील आठ शहरांमधील २५ नामांकित वास्तुकला महाविद्यालयांच्या ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचा विषय पोरस सिटी, पोरस आर्किटेक्चर अर्थात मुक्तसंचारी शहरातील बंधनमुक्त वास्तुप्रकल्प असा होता. अकारा अर्थात एशियन कॉन्टेस्ट ऑफ आर्किटेक्चरल रूकीज अवॉर्ड ही वास्तुकलेच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा असून, या स्पर्धेतील सुवर्ण पारितोषिक विजेत्या दोन विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. जपानचे डॉ. यॉंगिल ली हे या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे प्रमुख आयोजक आहेत. स्पर्धेचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या आर्किटेक्ट सुचिता सयाजी यांनी केले. ज्येष्ठ प्राध्यापक आर्किटेक्ट शेखर गरुड यांनी परीक्षकांचा परिचय करून दिला. अकारा स्पर्धेद्वारे वास्तुकलेच्या विद्यार्थ्यांना आपले शैक्षणिक काम आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करण्याची संधी मिळते. त्यामुळे पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर गेल्या १४ वर्षांपासून ही वार्षिक स्पर्धा आयोजित करत आहे, असे आर्किटेक्ट सुचिता सयाजी यांनी म्हणाले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. नीरजा लुगानी सेठी, प्रा. कृष्ण कुमार धोटे, डॉ. नबनिता साहा, प्रा. मीनल येर्रामशेट्टी, प्रा. जाई मालपानी आणि आर्किटेक्ट दुश्यंत आशेर यांनी केले. सुवर्ण पारितोषिक : सी. साई लक्ष्मी सहस्र चित्कोम्मदिन्ना (वाडियार सेंटर फॉर आर्किटेक्चर, म्हैसूर) आणि राघव चव्हाण (रचना संसदचे अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर, मुंबई) यांनी मिळवले. दोन्ही विजेत्यांना प्रत्येकी १५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. तसेच त्यांना अकारा २०२६ च्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. रौप्य पारितोषिक : तान्या माहेश्वरी आणि श्रीराम किशोर पलानीवेलू (यूएसएमएस कमला रहेजा विद्यानिधी इन्स्टिट्यूट फॉर आर्किटेक्चर अँड एन्व्हायर्नमेंटल स्टडीज, मुंबई) तसेच सुयश काटकर (विवेकानंद एज्युकेशन सोसायटीज् कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई) यांनी मिळवले. रौप्य विजेत्यांना प्रत्येकी ७ हजार ५०० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांना प्रमाणपत्रे व ट्रॉफी, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.





## ३८ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये अनुराधा मराठे, चारुदत्त आफळे, बालभारती यांचे सत्कार

**पुणे : दैनिक संध्या**

कला, गायन, वादन, नृत्य, संगीत, साहित्य व क्रीडा यांचा मनोहारी संगम असणाऱ्या ३८ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये ज्येष्ठ गायिका अनुराधा मराठे, ज्येष्ठ कीर्तनकार चारुदत्त आफळे आणि बालभारती संस्था यांचे विशेष सत्कार आयोजित करण्यात आले आहेत. श्री. गणेश प्रतिष्ठापनेनंतर सलग ३ दिवस पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे रोज सकाळी १०.३० वाजता हे सत्कार समारंभ संपन्न होतील. मंगळवार दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता पत्रकार भवन येथे प्रख्यात मराठी सुगम संगीत गायिका अनुराधा मराठे यांचा ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे. सन्मानचिन्ह, शाल, साडी व श्रीफळ असे सन्मानाचे स्वरूप आहे. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते सत्कार संपन्न होईल. या कार्यक्रमात अनुराधा मराठे यांच्या संगीत जीवनावर आधारित त्यांची प्रकट मुलाखत घेतली जाणार असून ज्येष्ठ निवेदिका मंजिरी धामणकर ही विशेष मुलाखत घेतील. दरवर्षी पुणे फेस्टिव्हलमध्ये कीर्तन महोत्सव आयोजित केला जातो. यंदाचे याचे सहावे वर्ष आहे. यंदा महाराष्ट्राची नारदीय कीर्तन परंपरा समर्थपणे पुढे नेणारे ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. चारुदत्त आफळे यांचा विशेष सन्मान बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. सन्मानचिन्ह, पुणेरी पगडी, शाल व श्रीफळ असे सन्मानाचे स्वरूप आहे. याप्रसंगी श्री हरि कीर्तनोत्तेजक सभेचे विश्वस्त कीर्तन कलानिधी, कीर्तन केसरी ह. भ. प. रामचंद्र प्रभाकर भिडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमात प्रारंभी युवा कीर्तनकार सौ. तन्मयी मेहेंदळे कुलकर्णी नांदी सादर करणार असून ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. निवेदिता मेहेंदळे 'श्री. गणेश उपासना' कीर्तन सादर करतील. 'बालभारती' महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही महाराष्ट्रातील शालेय पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम तयार करणारी शासनाची मुख्य संस्था आहे. याची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी झाली असून यंदा 'बालभारती'चे ६० वे वर्ष साजरे होत आहे. बालभारती तर्फे मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, कन्नड, तेलुगू, सिंधी व गुजराती अशा ८ भाषांमध्ये दरवर्षी कोट्यावधी पुस्तके प्रकाशित व वितरीत होतात. 'बालभारती'च्या या अद्वितीय योगदानाबद्दल पुणे फेस्टिव्हल तर्फे बालभारती संस्थेचा सत्कार गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. 'बालभारती'च्या संचालिका मा. अनुराधा ओक

# प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना 'उद्योगरत्न' पुरस्कार प्रदान

### औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील सर्वांगीण योगदानाची दखल; मुंबईत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान

**■ पुणे (दै. संध्या)**

शैक्षणिक, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, संस्थानिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकीय दृष्टिकोन आणि सामाजिक उपक्रमांमधील भरीव योगदानाची दखल घेत, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना प्रतिष्ठेच्या 'उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबईतील ताज विवांता येथे न्यूज १८ लोकमत आयोजित विशेष सोहळ्यात महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रा. डॉ. चोरडिया यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्ष सुषमा चोरडिया उपस्थित होत्या. हा गौरव त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा, शिक्षण क्षेत्रातील समर्पित कार्याचा आणि समाज व राष्ट्रनिर्मितीप्रती असलेल्या अखंड बांधिलकीचा सन्मान आहे.

'महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रातील दिग्गज एकाच व्यासपीठावर' या संकल्पनेअंतर्गत हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आठ मान्यवरांचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये शिक्षण क्षेत्रातून महाराष्ट्रातील एकमेव पुरस्कारार्थी म्हणून प्रा. डॉ. संजय चोरडिया यांची निवड करण्यात आली. 'उद्योगरत्न' उपक्रमातून विविध क्षेत्रांत



उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेण्यात आली. तसेच महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासासमोरील संधी, आव्हाने आणि भविष्यातील शक्यता यावरही या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला.

प्रा. डॉ. चोरडिया यांनी १९९९ मध्ये शिक्षण क्षेत्रातील कार्याला सुरुवात केली. पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन आत्मविश्वासू, कुशल, जबाबदार आणि सामाजिक भान असलेले नागरिक घडविण्याच्या उद्देशाने त्यांनी कार्य सुरू केले. गेल्या २७ वर्षांत सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या विस्ताराचे नेतृत्व करताना विविध शैक्षणिक संस्था आणि उपक्रमांच्या विकासात त्यांनी योगदान दिले आहे. दोन दशकांहून अधिक काळाचा औद्योगिक अनुभव आणि शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ वाटचाल यामुळे त्यांची उद्योगाभिमुख शिक्षण, कौशल्य विकास, मूल्याधिष्ठित शिक्षण, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकी याविषयीची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. शिक्षण आणि उद्योग यांनी एकत्रितपणे काम केल्यास कुशल मनुष्यबळ निर्माण होऊन देशाच्या विकासाला चालना मिळू शकते, असा त्यांचा विश्वास आहे. याच दृष्टिकोनातून 'सूर्यभारत' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची संकल्पना पुढे नेण्यात येत आहे.

'सूर्यभारत' हा शिक्षण, कौशल्य, तंत्रज्ञान, नवकल्पना आणि उद्योजकता यांचा समन्वय साधणारा भविष्याभिमुख उपक्रम म्हणून विकसित करण्याची संकल्पना आहे. भारताच्या आर्थिक विकासाला चालना देतानाच नव्या संधी निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. विविध क्षेत्रांना एकत्र आणण्याचा प्रयत्न 'सूर्यभारत'च्या माध्यमातून केला जाणार आहे. या एकात्मिक दृष्टिकोनातून उद्योजकतेला प्रोत्साहन, रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकासाच्या संधी निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. गुणवत्ता, नैतिक प्रशासन, नियमांचे पालन, नवकल्पना आणि शाश्वत विकास या तत्त्वांवर आधारित 'सूर्यभारत'च्या माध्यमातून भारतीय उद्योजकतेला बळकटी देत विकसित भारताच्या वाटचालीत योगदान देण्याचे उद्दिष्ट आहे. स्वामी विवेकानंद, जेआरडी टाटा, आदित्य विक्रम बिर्ला, अझीम प्रेमजी, नारायण मूर्ती आणि सद्गुरू यांच्या विचारधारा व कार्यातून प्रेरणा घेत 'सूर्यदत्त'मध्ये दूरदृष्टी, उत्कृष्टतेचा ध्यास, नवोन्मेष, उद्योजकता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना सातत्याने प्राधान्य दिले जाते. याच मूल्याधिष्ठित विचारांना केंद्रस्थानी ठेवून सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन आणि सूर्यभारत ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता, नवोन्मेष आणि उद्योगनिर्मितीला चालना देत समाज आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थपूर्ण व परिवर्तनशील संधी निर्माण करण्याचे कार्य पुढे नेले जात आहे.

प्रा. डॉ. संजय चोरडिया म्हणाले, "उद्योग रोजगार आणि संधी निर्माण करतो, तर त्या संधींना गती देण्यासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ शिक्षणातून तयार होते. शिक्षणातून कौशल्य, कौशल्यातून संधी आणि संधींतून विकास, या विश्वासातून 'सूर्यभारत'ची वाटचाल सुरू झाली आहे." शिक्षण, उद्योग आणि सामाजिक विकास यांच्यातील दुवा अधिक मजबूत करून कुशल मनुष्यबळ घडविणे, नव्या संधी निर्माण करणे आणि भविष्यकालीन समाजाची उभारणी करणे, हा या संकल्पनेचा केंद्रबिंदू आहे." या प्रतिष्ठित सन्मानाबद्दल सूर्यदत्त परिवार आणि संपूर्ण सूर्यदत्त परिवारातील सदस्यांच्या वतीने प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. ज्ञान, मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची सांगड घालत परिवर्तनाची वाटचाल घडविणाऱ्या त्यांच्या कार्याला मिळालेली ही पावती प्रत्येक सूर्यदत्त परिवारासाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत, त्यांच्या नेतृत्वातून आणि कार्यातून भविष्यातही असंख्य विद्यार्थी, युवा, उद्योजक आणि समाजघटकांना प्रेरणा मिळत राहो आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाला यशाची नवी शिखरे लाभोत, अशी भावना सूर्यदत्त परिवारातील सर्वांनीच व्यक्त केली आहे.

## पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचे येत्या २६ व २७ सप्टेंबरला यशदामध्ये आयोजन

**■ पुणे (दै. संध्या)**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त परभन्ना फाउंडेशन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. बाणेर येथील यशदामध्ये येत्या २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी हा दोन दिवसीय महोत्सव होणार असून, महोत्सवामध्ये लघुपटांच्या प्रदर्शनासोबतच मुलाखती, परिसंवाद, समूहचर्चा आणि मास्टरक्लास आदी संवादात्मक सत्रे होणार आहेत, अशी माहिती परभन्ना फाउंडेशनचे प्रमुख व महोत्सवाचे प्रमुख संयोजक गणेश चप्पलवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.




प्रसंगी महोत्सव सल्लागार समितीचे सदस्य डॉ. राजीव घोडे, जीवराज चोले, एथिकल ट्रॅव्हल प्रोफेशनल असोसिएशनचे (ईटीपीए) अध्यक्ष सुशील पाटील, समन्वय समिती सदस्य पवन घटकांबळे, अजित मांदळे, साहिल भोसले आणि असीम त्रिभुवन, ट्रॅव्हल एजंट असोसिएशन पुणेचे (टॅप) अध्यक्ष निलेश भन्साळी आदी उपस्थित होते.

## मोफत गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**■ पुणे (दै. संध्या)**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घराघरात पोहोचविण्याच्या उद्देशाने मांजरी येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेला विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मांजरी, शेवाळेवाडी, केशवनगर आणि साडेसतरा नळी परिसरातील १२५ हून अधिक विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमात सहभागी होत स्वतःच्या हाताने शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारण्याचा अनुभव घेतला.

संजीव सोशल फाउंडेशनच्या वतीने संस्थापक छाया संजीव गदादे यांच्या पुढाकाराने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळा पूर्णपणे मोफत होती. विद्यार्थ्यांना केवळ गणेशमूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले नाही, तर मूर्ती तयार करण्यासाठी आवश्यक असलेले संपूर्ण



साहित्य आणि साधनेही फाउंडेशनच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये पर्यावरणपूरक शाडू माती, गणेशमूर्तीचा बेस, मूर्ती घडविण्याची विविध साधने, रंग, ब्रश तसेच सजावटीच्या साहित्याचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात फाउंडेशनचे उपाध्यक्ष सूरज चव्हाण आणि संगीता दिवेकर यांच्या हस्ते भगवान श्री गणेश व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. या वेळी स्वप्निल चतुर, अभिषेक सागरे, अक्षय दिवेकर, जान्हवी तायडे, अमृता भोसले, जयश्री गदादे, सार्थक खांडके, छाया गदादे उपस्थित होते.

## 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' अंतर्गत 'विश्वविनायक २०२६' कलाप्रदर्शन १५ सप्टेंबरपासून

**■ पुणे (दै. संध्या)**

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना आपल्या कलेची सेवा गणरायाच्या चरणी अर्पण करता यावी, या उद्देशाने 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' अंतर्गत 'विश्वविनायक २०२६' या भव्य कलाप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ते २० सप्टेंबरदरम्यान घोले रस्त्यावरील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरीत हे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

मंगळवार (ता. १५) ते रविवार (ता. २०) या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत हे प्रदर्शन सर्व रसिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे, अशी माहिती निमंत्रक व ग्लोबल गणेश फेस्टिव्हलचे अध्यक्ष वैभव वाघ यांनी दिली. चित्रकला, शिल्पकला, व्यंगचित्रकला आदी कलाविष्कार रसिकांना पाहता येणार आहेत. या प्रदर्शनात दिनकर थोपटे, भगवान रामपुरे, अजिंक्य कुलकर्णी, अझरुद्दीन इनामदार, अतिफ पाचापुरी, अतुल गेंदले, अमित ढाणे, उमाकांत कानडे, कुडलय्या हिरेमठ, गणेश कळसकर, गणेश माने, दिग्विजय कुंभार, नवनाथ फेंगसे, प्रेम आवले, रवींद्र देव, शील सडवेलकर, महेंद्र मोरे, मोहन जाधव, रमेश भोसले, राम खरटमल, वर्षा खरटमल, वृषभ आंबले, वेदांत जाधव, शरद तरडे, संजय भालेराव, सुधीर पवार, ज्ञानेश्वर सोमुलवार आणि महेश साळगावकर या कलाकारांच्या कलाकृतींचा समावेश आहे.

प्रदर्शनादरम्यान विविध कलाप्रकारांची प्रात्यक्षिकेही आयोजित करण्यात आली आहेत. त्यामध्ये बुधवारी (ता. १६) सायंकाळी ४ वाजता चित्रकार कुडलय्या हिरेमठ यांचे चित्रकला प्रात्यक्षिक, गुरुवारी (ता. १७) सायंकाळी ४ वाजता शिल्पकार नवनाथ फेंगसे यांचे शिल्पकला प्रात्यक्षिक, तर शनिवारी (ता. १९) सायंकाळी ४ वाजता ज्येष्ठ व्यंगचित्रकार वैजनाथ दुलंगे यांचे व्यंगचित्रकला प्रात्यक्षिक होणार आहे.

या कलामहोत्सवात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील कलाकारांना सहभागी होता येणार आहे.

## 'पुणे ऑन पेडल्स' सायकल रॅलीचे उद्या रविवारी (ता. १३) आयोजन

**■ पुणे (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून 'पुणे ऑन पेडल्स' सायकल रॅली, तसेच 'पुणे फॅमिली वॉकेथॉन'चे आयोजन केले आहे. उद्या रविवारी (ता. १३) सकाळी ६ वाजता मयूर कॉलनीतील बालशिक्षण मंदिर येथून रॅलीला सुरुवात होणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती असणार आहे.


प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "पुणे हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जाते. सायकल वापरणे आरोग्यासाठी लाभदायक असून, सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम गेल्या सहा वर्षांपासून आयोजित केला जात आहे. ही रॅली केवळ सायकल चालविण्याचा कार्यक्रम नसून सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यजागृतीचा संदेश देणारा उपक्रम आहे. या सायकल रॅलीच्या निमित्ताने गरीब गरजू विद्यार्थ्यांना १५० सायकलींचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. तसेच रॅलीत सहभागी प्रत्येकाला पदक, प्रमाणपत्र आणि टी-शर्ट देऊन गौरविण्यात येणार आहे." सायकल रॅलीसाठी स्वतःची सायकल आणणे आवश्यक आहे, सर्व सायकलस्वारांनी हेल्मेट वापरणे अनिवार्य आहे.

# अश्लील डीजे डान्स मुक्त पूणे या आमच्या प्रयत्नांना अखेरीस यश- टिना शर्मा घेवारे

**■ पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि सामाजिक ओळख जपण्यासाठी अश्लील व विभत्स डीजे डान्सप्रकारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अभिनेत्री व सामाजिक कार्यकर्त्या टीना शर्मा घेवारे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता त्याला यश आले आहे. पुणे जिल्ह्यात अशा प्रकारांविरोधात प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाईचे त्यांनी स्वागत केले असून, हीच मोहीम संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याची मागणी त्यांनी केली आहे. अश्लील डीजे डान्सच्या वाढत्या प्रकारामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रतिमेला धक्का बसत असल्याचे सांगत टीना शर्मा घेवारे यांनी महाराष्ट्र शासन तसेच पुणे जिल्हा प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. पुणे जिल्हाधिकारी, पुणे पोलीस आयुक्त, गृह विभाग तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे या संदर्भात निवेदने देऊन कारवाईची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले आहे.

या पाठपुराव्यामध्ये चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांचे सहकार्य लाभल्याचेही त्यांनी नमूद केले.कलाकारांच्या वतीने प्रशासनाकडे सातत्याने हा प्रश्न मांडण्यात आला असून, त्यासंदर्भातील कागदपत्रे आणि निवेदने आपल्याकडे उपलब्ध असल्याचे घेवारे यांनी सांगितले."आमच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळताना दिसत आहे. पुणे जिल्ह्यात प्रशासनाकडून अशा प्रकारांवर कारवाई होत आहे, ही समाधानाची बाब आहे अशी



प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राला महापुरुष,संतांची, समाजसुधारकांची आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेची भूमी म्हणून ओळखले जाते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक कार्यक्रमांच्या नावाखाली अश्लील आणि विभत्स प्रकार वाढू नयेत.गेल्या काही वर्षांत विविध कार्यक्रमांमध्ये अश्लील नृत्यप्रकार वाढले असून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.महाराष्ट्राची एक समृद्ध परंपरा आहे. महाराष्ट्राची ओळख ही संतांची आणि सुसंस्कृत महाराष्ट्र अशी आहे. त्यामुळे अशा प्रकारांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होऊ नये, यासाठी आम्ही भूमिका घेतली असे घेवारे यांनी स्पष्ट केले. या प्रश्नावर महाराष्ट्र शासनातील संबंधित मंत्री, प्रशासकीय अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आणि पुणे पोलीस प्रशासनाकडेही निवेदने देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.पुण्यातूनच अशा प्रकारांविरोधातील ठोस कारवाईला सुरुवात व्हावी, ही आपली प्रमुख मागणी होती आणि आता त्याची अंमलबजावणी होताना दिसत असल्याचे घेवारे यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या कारवाईचे स्वागत करताना ही मोहीम केवळ पुण्यापुरती मर्यादित न ठेवता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही राबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. विशेषतः एका शहराची किंवा जिल्ह्याची ओळख वापरून इतर ठिकाणी कार्यक्रमांमध्ये अश्लील डीजे डान्स सादर केले जात असतील.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शालेय फुटबॉल स्पर्धेत शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलचे दैदिप्यमान यश!

**सासवड: दैनिक संध्या**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवडच्या विद्यार्थ्यांनी दिवे येथे दि.१० सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेतील तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावला असून, या शानदार कामगिरीच्या जोरावर संघाची जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धेत सांघिक भावना, शिस्त, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे दर्शन घडविले. तसेच १७वर्षे वयोगटातील मुलांच्या संघानेही दमदार खेळ करत तृतीय क्रमांक मिळविला. दोन्ही संघांच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्वल परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. या यशासाठी क्रीडा शिक्षक श्री. संतोष गलांडे सर यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सराव व योग्य प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि संघभावनेच्या जोरावर हे यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत टकले सर, उपप्राचार्य सुषमा रासकर मॅडम, तसेच संस्थेचे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थी, क्रीडा शिक्षक व सर्व संबंधित शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### गणेश मांडेकर यांचा सोसायटीच्या निवडणुकीत दणदणीत विजय

**चाकण : दैनिक संध्या**



प्रचंड टोकाचे राजकारण असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यातील आंबेठाण, बोरदरा व वराळे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या प्रतिनिधी निवडणुकीत शिवसेनेचे विभाग प्रमुख तथा आंबेठाण गावचे माजी सरपंच गणेश सदाशिव मांडेकर यांनी दणदणीत विजय मिळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद बुट्टे पाटील यांचा सहाविरुद्ध पाच मतांनी पराभव झाला. गणेश मांडेकर यांना सहा मते, तर शरद बुट्टे पाटील यांना पाच मते मिळाली. या सोसायटीच्या अकरा संचालकांनी या निवडणुकीत मतदान केले होते. निवडणुकीनंतर मांडेकर समर्थकांनी गणेश मांडेकर यांचा शाल, श्रीफळ देऊन जोरदार सत्कार केला. सोसायटीची ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी येथील ग्रामस्थ आणि सोसायटीच्या संचालकांची अपेक्षा होती. मात्र शरद बुट्टे पाटील यांना यापूर्वी दोन वेळा सोसायटीच्या प्रतिनिधी म्हणून संधी देण्यात आली होती. त्यामुळे यावेळी कार्यकर्त्याला संधी द्यावी अशी विनंती संचालक तसेच इच्छुक उमेदवार गणेश मांडेकर यांनी केली होती. बुट्टे पाटील यांनी मात्र मतदानाच्या माध्यमातून निर्णय घेण्याची भूमिका घेतल्याने अखेर निवडणूक घेण्यात आली. लोकशाही पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत मांडेकर यांनी सहा मते मिळवत विजय खेचून आणला. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी आंबेठाण गावचे माजी सरपंच सुभाष मांडेकर, दत्तात्रय चव्हाण, अशोक मांडेकर, ज्ञानेश्वर घाटे, शरद मांडेकर व बबन घाटे यांनी पुढाकार घेतला होता. बाजीराव काळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी आंबेठाण बोरदरा व वराळे या तिन्ही गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. खेड तालुक्याचे आमदार बाबाजी काळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी वर्पे आदींनी यासाठी विशेष सहकार्य केल्याचे गणेश मांडेकर व सुभाष मांडेकर यांनी सांगितले. शरद बुट्टे पाटील यांना या निवडणुकीत पुन्हा जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी प्रतिनिधित्व मिळवून राजकीय वाटचाल पुढे नेण्याची इच्छा होती. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी ग्रामस्थ तसेच सोसायटीच्या संचालकांची अपेक्षा होती. मात्र तसे न झाल्याने मतदारांनी लोकशाही पद्धतीतून आम्हांला कौल देऊन काम करण्याची संधी दिली असे गणेश मांडेकर, विभाग प्रमुख शिवसेना, आंबेठाण यांनी सांगितले.



### चाकणला प्रभाग क्रमांक तीनमध्ये सुरू होतेय विकास कामांची नांदी : सुवर्णा राक्षे

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीन मधील समर्थ कॉलनी व कुसुम विहार मधील अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या ड्रेनेजच्या आउटलेटच्या कामास गती मिळाली असून, तरुण कार्यकर्त्यांची फळी एकत्रित आल्यामुळे खऱ्या अर्थाने चाकणला प्रभाग क्रमांक तीनमध्ये विकास कामांची नांदी सुरु झाली असल्याचे प्रतिपादन चाकण नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा व नगरसेविका सुवर्णा राक्षे यांनी केले. सुवर्णा राक्षे पुढे म्हणाल्या,"खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांची प्रेरणा घेऊन प्रभाग क्रमांक तीनमध्ये कार्यकर्ते एकत्रित आल्यामुळे मोठ्या जोमात विकास कामांची दिवाळी सुरू झाली आहे. गेले सात ते आठ वर्ष येथील कुसुम विहार व समर्थ कॉलनी मधील ड्रेनेजच्या आउटलेटचे काम सुरू करण्याचा निर्धार करण्यात आला होता. या कामास मुहूर्त मिळाला असून, सुवर्णा राक्षे व अनिल लोहकरे यांच्या विशेष प्रयत्नातून हे काम सुरू करण्यात आले आहे." दरम्यान, या कामासाठी नगराध्यक्षा मनीषा गोरे, गटनेते नितीन गोरे, मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व माजी नगरसेविका अनिता कौटकर व येथील ग्रामस्थ आदींचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे शिवसेनेचे चाकण शहर उपप्रमुख किरण कौटकर, श्रीकांत जाधव व श्यामराव राक्षे आदींनी सांगितले.

# सनदी लेखापालांनी तंत्रज्ञानाचा अंगीकार करत प्रगती साधावी

## सीए अतुल पै यांचे प्रतिपादन; 'आयसीएआय'च्या दीक्षांत सोहळ्यात ६०० स्नातकांना पदवी प्रदान

■ **पुणे (दै. संध्या)**

"सनदी लेखापालांची (सीए) ओळख विश्वासार्ह सल्लागार अशी आहे. त्यामुळे त्यांनी व्यावसायिक कार्यात प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांना सर्वोच्च प्राधान्य देत, समाज आणि राष्ट्राच्या विकासात अमूल्य योगदान देत राहावे. प्रगत तंत्रज्ञानाचा अंगीकार करीत आपल्या व्यावसायिक प्रगतीसाठी उपयोग करावा. ज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या समन्वयातून समाज व देशाच्या विकासासाठी मूल्यनिर्मिती करणारे परिणाम साधता येतात," असे प्रतिपादन हनीवेल ऑटोमेशन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सीए अतुल पै यांनी केले. सीए हे राष्ट्रनिर्मितीतील भागीदार आहेत, असे कौतुकही त्यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पुणे शाखेच्या वतीने आयोजित दीक्षांत सोहळ्यात सीए अतुल पै विशेष अतिथी म्हणून बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवनात आयोजित सोहळ्यावेळी




'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य व दीक्षांत सोहळ्याचे मुख्य समन्वयक सीए उमेश शर्मा व सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समितीचे सदस्य सीए रेखा धामणकर, सीए अभिषेक धामणे, पुणे शाखेचे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष सीए निलेश येवलेकर, सचिव सीए नेहा फडके, खजिनदार सीए नंदकुमार कदम, 'विकासा' चेअरपर्सन सीए सारिका दिंडोकर, माजी अध्यक्ष सीए सचिन मिणियार आदी उपस्थित होते. या सोहळ्यात ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आली. 'आयसीएआय'च्या मुख्य दीक्षांत सोहळ्यात केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सीए अतुल पै यांनी नव्याने सनद प्राप्त केलेल्या सनदी लेखापालांना आपल्या अनुभवातून मार्गदर्शन करत व्यावसायिक जबाबदारी आणि तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले. देशाच्या विकास प्रक्रियेत आर्थिक व्यवस्था प्रामाणिक आणि समाजासाठी उपयुक्त मूल्यनिर्मिती करणारी राहावी, यासाठी सनदी लेखापालांनी महत्त्वाची भूमिका बजावावी. समाजाच्या आणि देशाच्या हितासाठी योगदान देण्याची संधी तुम्हाला मिळते. त्यामुळे कामकाजात योग्य मार्गदर्शन, प्रामाणिकपणा आणि नैतिकता जपणे आवश्यक आहे. नोकरी किंवा व्यवसाय करताना स्वतःसह आपल्या सहकाऱ्यांच्या प्रगतीमध्येही योगदान द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

सीए उमेश शर्मा म्हणाले, "सनदी लेखापाल हे केवळ आर्थिक क्षेत्रातील व्यावसायिक नसून, राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वाचे भागीदार आहेत. ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्याची जबाबदारी सीएंची आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), वस्तू व सेवा कर (जीएसटी), ट्रिब्युनल तसेच डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) कायदा यांसारख्या विविध विषयांवर नवीन अभ्यासक्रम आणि उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. नवोदित सीएंनी या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन भविष्यात देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी योगदान द्यावे. तंत्रज्ञानाच्या बदलांना घाबरण्याची गरज नाही. सीएंनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून त्याचा आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या विकासासाठी उपयोग करावा. ज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून समाज तसेच देशाच्या हितासाठी मूल्य निर्माण करणारे परिणाम साधता येतात, असे शर्मा यांनी सांगितले.

सीए प्रणव आपटे म्हणाले, "आजचा समारंभ हा विद्यार्थ्यांच्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव करणारा आहे. बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात अकाउंट्स क्षेत्र केवळ आकड्यांपुरते मर्यादित नसून जबाबदारी, पारदर्शकता आणि विश्वासाचे प्रतीक बनले आहे. विद्यार्थ्यांनी सतत नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आत्मसात करत स्वतःला अद्ययावत ठेवावे. ज्ञानामध्ये केलेली गुंतवणूक आयुष्यातील मौल्यवान आणि कायम उपयोगी ठरणारी गुंतवणूक आहे."

## बारामती तालुक्यात १९५ ब्रास गौणखनिज साठ्याच्या विक्रीसाठी निविदा

■ **बारामती (दै. संध्या)**

बारामती तालुक्यातील होळ-सस्तेवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलावाच्या उत्खननातून निघालेली माती, मुरूम व दगड आदी गौणखनिज साठ्याची विक्री करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. इच्छुक अर्जदारांनी १७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात निविदा निवासी नायब तहसिलदार, बारामती यांच्याकडे निविदा सादर कराव्यात असे कळविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म शाखा, पुणे यांच्या सूचनेनुसार ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत होळ-सस्तेवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलावाच्या उत्खननातून उपलब्ध झालेला १९५ ब्रास माती, मुरूम व दगड साठा निविदेद्वारे विक्रीसाठी उपलब्ध आहे.

या साठ्यासाठी १ लाख १७ हजार रुपये लघुत्तम किंमत निश्चित करण्यात आली आहे. निविदेसोबत २५ हजार रुपयांचा अनामत रकमेचा धनादेश तहसिलदार, बारामती यांच्या नावे सादर करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने आधारकार्ड व पॅनकार्डद्वारे ओळखीचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.

## चतुर्थी सणानिमित्त मत्स्यव्यावसायिक महिलांना मत्स्य संस्थेतर्फे कडधान्य वाटप

■ **आचरा (दै. संध्या)**

सिंधुदुर्ग जिल्हा महिला मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्थेने सलग 14 व्या वर्षी गणेश चतुर्थीच्या सणाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सुमारे 2400 महिला सभासदांना ना-नफा-ना तोटा या तत्वावर कडधान्य वाटप केले आहे.

आचरा विभागातील महिलांना कडधान्य वाटप करताना सिंधुदुर्ग जिल्हा महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्नेहा केरकर, संस्थेचे संस्थापक व गाबीत समाजाचे जिल्हाध्यक्ष श्री. चंद्रशेखर उपरकर, सौ. गौरी सारंग, श्रीमती. सुमाली चोपडेकर, सौ. रंजना खराडे, श्री. आदित्य केरकर व बहुसंख्य मत्स्यव्यावसायिक महिला उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना सौ. स्नेहा केरकर यांनी सांगितले की, या संस्थेची स्थापना झाल्यापासून गेली 14 वर्षे सलग आम्ही हा उपक्रम गोरगरीब मच्छीमार महिलांना गणेश चतुर्थीच्या सणामध्ये मदत करण्यासाठी सुरु ठेवला आहे. त्यास महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.



यावर्षी या कडधान्यामध्ये पावटे,मूग डाळ, चणाडाळ, काळे वाटाणे, हिरवे वाटाणे,चणे,चवळी,गूळ, रवा,गोडेतेल प्रति 1 किलो प्रमाणे प्रत्येक महिलेला 10 किलो कडधान्य वाटप करण्यात आले. विशेषतः किनारपट्टी भागातील कर्ली, पाट, परुळे,केळूस,देवबाग, तारकर्ली, वायरी, देवली, दांडी, धुरीवाडा, मालवण शहर, कोळंब, सर्जेकोट, तळाशील, तोंडवली, रेवंडी, आचरा इत्यादी गावातील सुमारे 2400 सभासद महिलांना वाटप करण्यात आले आहे.

याशिवाय आता राज्य शासनाच्या मत्स्य संपदा योजनेतून मिळणाऱ्या नि:शुल्क रुपये 5000/- अपघाती विमा योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा त्यासाठी चतुर्थी सणानंतर मत्स्य अधिकाऱ्यांना सोबत घेऊन महिलांची विमा योजनेची नोंदणी करण्यात येईल. त्यासाठी जिल्ह्यातील मत्स्यव्यावसायिक महिलांनी संस्थेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**संचालक**
**उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे कार्यालय,**
बांधकाम भवन, दुसरा मजला, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
Email-dirmum.pg@mahapwd.gov.in फोन :-०२२-२२०१६८५२

**निविदा सुचना क्र. ३७ सन २०२६-२७**

संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबन रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१, दुरध्वनी क्र. ०२२-२२०१६८५२ हे सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने, पुणे कार्यालय येथे कंत्राटी पद्धतीने ०१ कनिष्ठ लिपिक पुरविणे. (रूपये दश लक्ष आत एकूण-१ कामाकरीता) अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार यांचेकडून ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत.

कोऱ्या निविदेचा नमुना दि. १६/०९/२०२६ ते दि. २३/०९/२०२६ रोजी सायं. १७.०० पर्यंत संचालक, उपवने व उद्याने, पुणे या कार्यालयातुन देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या सिलबंद निवीदा दि. २८/०९/२०२६ रोजी सायं. १४.०० वाजेपर्यंत संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयात स्विकारण्यात येतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडण्यात येतील.

सविस्तर निवीदा सुचना सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने, पुणे कार्यालयामध्ये सुचना फलकावर पहावयास मिळेल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निवीदा रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा क्र. संउवउ/लेशा/बी-१/नि.प्र./१२२७/२६-२७
संचालक, उपवने व उद्याने,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०१६८५२.
Email:- dirmum.pg@mahapwd.gov.in
दिनांक:- ०८.०९.२०२६

सही/-
(ज. व. चौगुले)
संचालक (प्रभारी)
उपवने व उद्याने,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विमाका/पुणे/जाहिरात/१५८/२०२६-२०२७

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पत्ता-सीटीसी क्र. 119/बी, प्रमिला अपार्टमेंट,
तिसरा मजला, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे 16
**जाहीर समन्स**

वादी - अर्थसंपदा नागरी सहकारी पतसंस्था मर्या, नारायणगाव, पत्ताः मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी मा. सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा), महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या जि. पुणे या कार्यालयाकडे संस्थेच्या थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांच्या विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी दावे दाखल केलेले आहेत. या सर्व थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांना त्यांचे म्हणणे मांडणेसाठी संधी देऊन दि. 18/08/2026, वार मंगळवार रोजी सकाळी 11.00 वा. मा. सहा. निबंधक, सह.संस्था (परसेवा) पुणे शहर द्वारा महाराष्ट्र राज्य सह. पत. मर्या. संपर्क कार्यालय नारायणगाव : व्हीजन गॅलक्सी, ए विंग शॉप नं. 2, जयहिंद मंगल कार्यालयासमोर, पुणे नाशिक हायवे, मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे या कार्यालयात सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु खालील जाबदार यांना वेळोवेळी सुनावणी नोटीस दिलेल्या पत्त्यावर आर.पी.ए.डी. द्वारे पाठविणेत आलेली आहे. परंतु प्रतिवादी यांना सुनावणी नोटीस रूजू न झाल्याने / त्यांचे नवीन पत्ते उपलब्ध नसल्याने त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडणेसाठी मा. सहा. निबंधक, सह.संस्था (परसेवा) पुणे शहर द्वारा महाराष्ट्र राज्य सह. पत. मर्या. संपर्क कार्यालय नारायणगाव : व्हीजन गॅलक्सी, ए विंग शॉप नं. 2, जयहिंद मंगल कार्यालयासमोर, पुणे नाशिक हायवे, मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे या कार्यालयात दि. 15/09/2026 वार मंगळवार रोजी सकाळी 11.00 वाजता सुनावणीसाठी बोलविण्यात येत आहे. ते याही वेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यांचे सदरील दाव्याबाबत काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून त्यांचे विरूध्द वसुली प्रमाणपत्र बाबतचा दावा निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रतिवादी**

| क्र. | कर्जदार/जामीनदार नाव | पत्ता | दावा क्र. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्जदार - सोलाट विघ्नहर रंगनाथ<br>जामीनदार- वायकर दिपक हरीभाऊ | मु. पो. गुंजाळवाडी आर्वी, सोलाटमळा, अर्वी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>मु. पो. गुंजाळवाडी, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | 874 | 4,73,564/- |
| 2 | कर्जदार- कोऱ्हाळे अभिषेक अविनाश<br>जामीनदार- १.पानसरे योगेश रघुनाथ<br>२.कोऱ्हाळे तुळशिदास बबन | मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | 875 | 1,00,073/- |
| 3 | जामीनदार- पानसरे वैभव दिपक | मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | 878 | 56,244/- |
| 4 | कर्जदार- शिंदे रमेश सदाशिव<br>जामीनदार- १. शिंदे वसंत सदाशिव<br>२. बनकर निलेश रामदास | मु. पो. नारायणगाव वारूळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>मु. पो. नारायणगाव वारूळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे<br>मु. पो. नारायणगाव बनकर वस्ती, ता. जुन्नर, जि. पुणे | 879 | 12,29,256/- |

स्वाक्षरीत -
(ज्योती दादासाहेब शिंदे)
मा. सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा)
महाराष्ट्र राज्य सह. पत. फेडरेशन मर्या.

कार्यालय
**जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे**
कार्यालयाचा पत्ता : प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११.
जा.क्र/जिवअ/पुणे/चौकशी/५२/२०२६ दिनांक : ०२ फेब्रुवारी २०२६

(जाहीर प्रगटन)
उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेच नाव व पत्ता : 1) नुर इ ईलाही सुन्नी जामा मस्जिद 2) हजरत चांद शाह वाली दर्गाह, मौ. खामुंडी, ता. जुन्नर, जि. पुणे (MSBW/PUN/570/2020)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार याकुब इब्राहीम शेख यांनी दि. २७/०१/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सभेत बहुमताद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| ०१ | याकुब इब्राहीम शेख | अध्यक्ष |
| ०२ | हजरत चाँदशाह वली | उपाध्यक्ष |
| ०३ | बादशहा पापाभाई मोमीन | सचिव |
| ०४ | जावेद अब्दुल रहेमान मोमीन | खजिनदार |
| ०५ | इस्माईल उर्फ अकबर पापाभाई मोमीन | सभासद |
| ०६ | याकुब हिराभाई तांबोळी | सभासद |
| ०७ | अरीफ प्यारे हुसेन पिरजादे | सभासद |
| ०८ | नजरुद्दीन जैनुद्दीन मोमीन | सभासद |
| ०९ | अल्लीमियाँ पापाभाई मोमीन | सभासद |
| १०. | शकील हाफिज मोमीन | सभासद |
| ११. | परवेज अब्दुल रहेमान मोमीन | सभासद |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे, प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११. येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

शिक्का

सही/-
जिल्हा वक्फ अधिकारी
(पुणे)

## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपरी-चिंचवड महापालिका शाळांच्या विकासाला गती

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला अधिक गतिमान आणि विद्यार्थीकेंद्रित बनवण्यासाठी शिक्षण सभापती रविना आंघोळकर यांनी शहरातील विविध महापालिका शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन सविस्तर पाहणी सुरू केली. शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, पिण्याची पाणी व्यवस्था, विद्यार्थ्यांची वाढती पटसंख्या, शिक्षणाचा उच्च दर्जा आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य या प्रमुख मुद्यांवर त्यांनी शाळा प्रशासनाशी सविस्तर चर्चा केली. या सकारात्मक आणि मार्गदर्शक भेटीमुळे महापालिका शाळांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. शाळांच्या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सभापती रविना आंघोळकर यांनी वर्गखोल्या, शाळा परिसर, खेळण्याचे मैदान आणि इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी उत्तम आणि सुरक्षित भौतिक वातावरण मिळावे, यासाठी आवश्यक त्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. याशिवाय, शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुद्ध व मुबलक पिण्याची पाणी व्यवस्था उत्तम स्थितीत असल्याबाबत त्यांनी पाहणी केली आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश दिले. महापालिका शाळांमधील दर्जेदार शिक्षणामुळे पालकांचा कल वाढू लागला असून, याच प्रक्रियेला अधिक वेग देण्यासाठी पटसंख्या वाढवण्यावर विशेष भर देण्याचे आवाहन सभापतींनी केले. केवळ विद्यार्थी संख्या वाढवणे नव्हे, तर शिक्षणाचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात टिकणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे उपक्रम राबवावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. शिक्षण सभापतींच्या या व्यापक पाहणी दौऱ्यामुळे महापालिका शाळांच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आली असून, विद्यार्थी हितैषी उपक्रमांना गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी हा दौरा मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

### रस्ते-गटार सफाई निविदेत ‘रिंग’?, नगरसेवक संदीप वाघेरे आक्रमक

**पिंपरी : दैनिक संध्या**


पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात रस्ते व गटार सफाईच्या कामांसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निविदादारांमध्ये संभाव्य संगनमत अथवा ‘रिंग’ झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने, सदर निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने खुल्या, पारदर्शक व व्यापक स्पर्धात्मक पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. सदर निविदा प्रक्रिया आज पूर्ण झाल्यानंतर संदीप वाघेरे यांनी आयुक्तांना निवेदन सादर केले. या निविदांना मोठा आर्थिक घोटाळा असून त्याचा थेट संबंध महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधीशी तसेच शहराच्या स्वच्छता व्यवस्थेशी आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया केवळ तांत्रिकदृष्ट्या पूर्ण होणे पुरेसे नसून ती वास्तविक, खुली आणि निष्पक्ष स्पर्धेतून पार पडली आहे का, याची खातरजमा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने निविदादारांमध्ये परस्पर संगनमत होऊन ‘रिंग’ निर्माण झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने निविदा प्रक्रियेत अपेक्षित व वास्तविक स्पर्धा झाली आहे किंवा नाही, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे उपलब्ध निविदा अभिलेख, निविदादारांची माहिती, आर्थिक बोलींचे स्वरूप आणि इतर संबंधित निदर्शकांची स्वतंत्र व वस्तुनिष्ठ पद्धतीने छाननी करण्याची मागणी वाघेरे यांनी केली आहे. निविदादारांचे समान पत्ते, संपर्क क्रमांक, ई-मेल, अधिकृत प्रतिनिधी, समान कागदपत्रांची रचना अथवा मजकूर, डिजिटल/तांत्रिक निदर्शक तसेच परस्पर व्यावसायिक संबंध यांची नियमानुसार तपासणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे आर्थिक बोलींमध्ये असामान्य साम्य, पूर्वनियोजित स्वरूपाच्या बोली अथवा कृत्रिम स्पर्धेचे कोणतेही संकेत आढळतात का, याचीही पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या संशयाची वस्तुनिष्ठ पडताळणी पूर्ण होईपर्यंत, निविदा मंजुरी, स्वीकृती अथवा पुढील कार्यादेशासंबंधीची कार्यवाही लागू नियमांच्या अधीन राहून स्थगित ठेवण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने विचार करावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. चौकशी किंवा छाननीदरम्यान वास्तविक व व्यापक स्पर्धा झालेली नसल्याचे अथवा निविदादारांमध्ये संगनमत झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यास, लागू शासन नियम व ई-निविदा प्रक्रियेतील तरतुदींनुसार सदर निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे वाघेरे यांनी म्हटले आहे. नव्याने निविदा काढताना निविदेतील अटी व शर्ती कोणत्याही विशिष्ट कंत्राटदारास अथवा मर्यादित गटास अनुकूल ठरणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच निविदेला व्यापक प्रसिद्धी देऊन जास्तीत जास्त पात्र व स्वतंत्र निविदादारांचा सहभाग वाढविण्यात यावा, जेणेकरून महानगरपालिकेला स्पर्धात्मक व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर दर मिळू शकतील, अशी मागणी वाघेरे यांनी केली आहे. “कोणत्याही विशिष्ट निविदादाराविरुद्ध आरोप करणे हा आमचा उद्देश नसून, महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधीचे संरक्षण, वास्तविक स्पर्धा, पारदर्शकता आणि निविदा प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास अबाधित ठेवणे हा मुख्य उद्देश आहे. निविदा प्रक्रियेबाबत गंभीर संशय निर्माण झाला असल्यास त्याची निष्पक्षपणे पडताळणी होणे आवश्यक आहे,” अशी भूमिका नगरसेवक संदीप वाघेरे यांनी निवेदनातून मांडली आहे.

### पिंपळे सौदागरमध्ये शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते ‘कलाग्राम शॉपिंग फेस्टिव्हल’चा शुभारंभ

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डनच्या बासुरी बँक्वेट हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘आपला आवाज आपली सखी’ प्रस्तुत कलाग्राम शॉपिंग फेस्टिव्हलचा दिमाखदार शुभारंभ भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी नगरसेविका अनिताताई काटे आणि कुंदाताई भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला उद्योजकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिकांना सणासुदीच्या खरेदीची एकाच छताखाली संधी मिळावी, या उद्देशाने या तीन दिवसीय शॉपिंग फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. १० ते १२ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. उद्‌घाटन प्रसंगी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, “महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ‘कलाग्राम’सारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक खरेदीला प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन नागरिकांसाठी मोठी संधी आहे. महिला व नागरिकांनी या फेस्टिव्हलचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा.” या फेस्टिव्हलमध्ये आकर्षक साड्या, रेडिमेड कपडे, नवनवीन डिझाईन्सचे दागिने, ॲक्सेसरीज, विविध भेटवस्तू तसेच होम डेकोर उत्पादनांचे शेकडो स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. महिला उद्योजकांनी सादर केलेल्या विविध उत्पादनांना नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# मिलिटरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचे काम संथ; ठेकेदारावर कारवाई



## 85 टक्के काम पूर्ण; भाववाढीचा निर्देशांक गोठवला, 1 सप्टेंबरपासून दररोज एक हजार रुपये दंड

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील मिलिटरी डेअरी फार्म येथे पुणे-लोणावळा लोहमार्गावर उड्डाण पूल बांधण्याचे काम संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे स्थापत्य विभागाने त्या ठेकेदारावर कारवाईचा बडगा उचलला आहे. कामाच्या भाववाढीचा निर्देशांक गोठवून, ठेकेदाराला दिवसाला एक सप्टेंबरपासून दिवसाला एक हजार रुपये दंड सुरू करण्यात आला आहे.

टी ॲण्ड टी इन्फ्रा. लि. असे त्या ठेकेदार कंपनीचे नाव आहे. पिंपरी कॅम्प, पिंपरी गाव, पिंपळे सौदागर, रहाटणी या भागास जोडण्यासाठी हा उड्डाण पूल संरक्षण विभागाच्या जागेत उभारण्यात येत आहे.

त्यामुळे पुणे-लोणावळा लोहमार्गाच्या क्रॉसिंगवर थांबण्याची गरज राहणार नाही. तसेच, अवजड वाहनेही सुलभपणे ये-जा करू शकणार आहेत. त्यासाठी पुणे-मुंबई जुन्या महामार्गापासून डेअरी फार्म रस्त्यावर 1 हजार 290 मीटर लांबीचा आणि 17.20 मीटर रुंदीचा 65 कोटी 28 लाख रुपये खर्चाचा उड्डाण पूल उभारण्यात येत आहे. कामास टी ॲण्ड टी इन्फ्रा. लि. कंपनीने 31 मार्च 2023 ला सुरुवात केली.

पुलाच्या कामासाठी अडथळा ठरणारी झाडे काढणे. तसेच, रेल्वे विभागाकडून विविध परवानग्या मिळण्यास विलंब झाल्याने हे काम दोन वर्ष मुदतीमध्ये म्हणजे 31 मार्च 2025 पर्यंत पूर्ण झालेले नाही. स्थापत्य प्रकल्प विभागाने संबंधित ठेकेदाराला वेळोवेळी तीन वेळा मुदतवाढ दिली आहे. तीन वेळा तब्बल 17 महिन्यांची मुदतवाढ देऊनही काम 31 जुलै 2026 पर्यंत पूर्ण न झाल्याने ठेकेदारावर कारवाई करण्यात आली आहे. आत्तापर्यंत केवळ 85 टक्के काम झाले आहे. एक ऑगस्टपासून भाववाढीचा निर्देशांक गोठवण्यात आल्याने ठेकेदाराला दरवाढ मिळणार नाही. तर, एक सप्टेंबरपासून दरदिवशी 1 हजार रुपये दंड करण्यात येत आहे. संपूर्ण काम संपेपर्यंत हा दंड आकारला जाणार आहे. तीन वेळा मुदतवाढ देऊनही ठेकेदार टी ॲण्ड टी इन्फ्रा. लि कंपनीवर कारवाई करण्यात आली आहे. एक ऑगस्टपासून भाववाढीचे निर्देशांक गोठवण्यात आला आहे. एक सप्टेंबरपासून प्रत्येक दिवसाला 1 हजार रुपये दंड आकाराला जात आहे, असे महापालिकेचे कार्यकारी अभियंता विजय भोजने यांनी सांगितले.

## १०० मीटर परिसरातील ७२ पानटपऱ्यांवर धडक कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ आणि सिगारेटची विक्री करणाऱ्या पानटपऱ्यांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मोठी कारवाई करण्यात आली. मे २०२६ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत एकूण ७२ अवैध पानटपऱ्या निष्कासित करण्यात आल्या.

शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळणे, त्यांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवणे आणि शैक्षणिक परिसरातील वातावरण सुरक्षित व स्वच्छ राखणे या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कारवाईत परिमंडळनिहाय मोठ्या प्रमाणात टपऱ्या हटविण्यात आल्या. त्यामध्ये परिमंडळ-१ मधील १७, परिमंडळ-२ मधील १८,



परिमंडळ-३ मधील २३ आणि परिमंडळ-४ मधील १४ अशा एकूण ७२ पानटपऱ्यांचा समावेश आहे.

पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता यांना प्राधान्य देत शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील अशा बेकायदेशीर व्यवसायांवर पुढील काळातही कठोर कारवाई सुरू राहणार आहे. तसेच नागरिकांनीही अशा प्रकारच्या विक्रीबाबत माहिती मिळाल्यास पोलीस व महापालिकेला कळवून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त व सुरक्षित शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी पोलीस आणि महापालिकेची ही संयुक्त मोहीम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## नगरसेविका गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त महा जन-आरोग्य शिबिर

■ पिंपरी (दै. संध्या)

नगरसेविका श्रीमती अनुराधाताई गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली आमदार अमित गोरखे यूथ फाऊंडेशन, संविधान संस्कार परिषद आणि डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री सिद्धिविनायक मंदिर, संभाजीनगर, चिंचवड येथे भव्य महा जन-आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन आमदार सौ. उमाताई खापरे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनातून आणि नेतृत्वाखाली नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देत आयोजित करण्यात आलेल्या या महा जन-आरोग्य शिबिरास पिंपरी विधानसभा मतदारसंघातील तसेच प्रभागातील ८२३ हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध आरोग्य तपासण्या व तज्ज्ञ वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला.



नागरिकांना वेळेवर आरोग्य तपासणी, वैद्यकीय मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार उपलब्ध व्हावेत, तसेच आरोग्यविषयक जनजागृती वाढावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. जनरल चेकअपअंतर्गत व्हायरल इन्फेक्शन, ताप, रक्तदाब, मधुमेह तसेच विविध सामान्य आजारांची तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले. नेत्र व अस्थिरोग तपासणी अंतर्गत डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू तपासणी तसेच आवश्यक उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कान, नाक व घसा (E.N.T.) संबंधित आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. महिलांसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, गरोदर महिलांची तपासणी व आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. बालरोग तज्ज्ञांकडून बालकांची तपासणी, तर त्वचारोग तज्ज्ञांकडून त्वचेच्या विविध विकारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गरज असलेल्या नागरिकांसाठी ईसीजी तपासणीची सुविधाही मोफत उपलब्ध करून देण्यात आली. शिबिराच्या ठिकाणी आयुष्मान भारत कार्ड नोंदणी केंद्राची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. पात्र नागरिकांची नोंदणी करून त्यांना आयुष्मान भारत कार्ड काढून देण्यात आले.

## शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महानगर पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि अतिक्रमण मुख्य कार्यालय उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व १० क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या या कारवाईत एकत्रितपणे सुमारे ८३ हजार ९९ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये आर.सी.सी. स्वरूपाची अनधिकृत बांधकामे, अनधिकृत पत्राशेड, नव्याने सुरू असलेली बांधकामे तसेच पदपथावरील अनधिकृत टपऱ्या, हातगाडे आणि इतर



अतिक्रमणांचा समावेश आहे.

अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील साईनगर, निगडी परिसरात अंदाजे ३ हजार ४९८ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील शगुन चौक, पिंपरी मार्केट, एम्पायर ब्रिजखाली चिंचवड आणि वाल्हेकरवाडी परिसरात १० हजार ५३८ चौरस फूट क्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. क क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत चिखली, कुदळवाडी, शिवरोड, रवी रंजन वजन काटा चिखली आणि डी-मार्ट शेजारी चिंचवड परिसरात १२ हजार ७२३ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ५ हजार ४०० चौरस फूट, तर ई क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी व मोशी परिसरात ७ हजार ९६५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या मोरे वस्ती, चिखली, तळवडे आणि नेवाळे वस्ती परिसरात सर्वाधिक १९ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. क्षेत्रीय कार्यालयाच्या राजवाडे नगर, गोकुळवाडी, पवनानगर, स्वप्ननगरी कॉलनी, काळेवाडी, डोंगरे कॉर्नर, मंगल नगर आणि थेरगाव परिसरात १३ हजार ३५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ह क्षेत्रीय कार्यालयाच्या जुनी सांगवी परिसरात १ हजार ८६ चौरस फूट, ज क्षेत्रीय कार्यालयाच्या वाल्हेकरवाडी, दत्त मंदिर रोड वाकड, पिंपळे निलख व किवळे परिसरात ६ हजार २८ चौरस फूट, तर ल क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी, इंद्रायणी नगर, संत तुकाराम नगर आणि पिंपरी परिसरात ३ हजार ४२६ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली.

## सुरक्षा व सुविधांची महापौर रवि लांडगे यांच्याकडून पाहणी

■ पिंपरी (दै. संध्या)


गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर करण्यात आलेल्या स्वच्छता, सुरक्षा आणि नागरिकांसाठीच्या सुविधांची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक सुविधा वेळेत पूर्ण करून मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महापौर रवि लांडगे म्हणाले, “गणेशोत्सव हा श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. गणेश विसर्जनाची प्रक्रिया सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडणे आवश्यक आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुरक्षित व सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे.” विसर्जन घाटांवरील स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, निर्माल्य संकलन, दिशादर्शक फलक, कृत्रिम विसर्जन हौद आणि सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विसर्जन घाटांवर भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रवेश व बाहेर पडण्याचे मार्ग सुकर ठेवावेत. घाट परिसरात चिखल, घसरडेपणा अथवा पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. घाट परिसरातील स्वच्छता सातत्याने राखण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करावे, अशा सूचनाही महापौरांनी दिल्या. निर्माल्य नदीपात्रात किंवा जलस्रोतांमध्ये जाणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देताना निर्माल्यकुंडांची योग्य ठिकाणी व्यवस्था करून त्याबाबत स्पष्ट दिशादर्शक फलक लावावेत, असे त्यांनी सांगितले. विसर्जनस्थळी निर्माण होणारा कचरा तातडीने संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. नागरिकांनीही निर्माल्य व इतर पूजासाहित्य जलस्रोतांमध्ये न टाकता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या व्यवस्थेचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

दैनिक संध्या | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे




### बिबट्याच्या हल्ल्यात फवारणी पंपामुळे दाम्पत्य बचावले

**नारायणगाव: दैनिक संध्या**

शेतात कामासाठी मोटारसायकलवरून निघालेल्या दाम्पत्यावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घातल्याने बोरी बुद्रुक येथील मेंटागळे परिसरात बुधवारी सकाळी थरारक घटना घडली. बिबट्याच्या अचानक हल्ल्यामुळे दत्तात्रय बाळाजी शिंदे आणि विद्या शिंदे हे मोटारसायकलवरून खाली पडले. मात्र, विद्या शिंदे यांच्या पाठीवर असलेला फवारणी पंप बिबट्याच्या हल्ल्यात अडथळा ठरल्याने मोठा अनर्थ टळला. दाम्पत्य मोटारसायकलवरून शेताकडे जात असताना रस्त्यालगत दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याच्या हल्ल्याने दोघेही घाबरून मोटारसायकलवरून खाली पडले. यावेळी विद्या शिंदे यांच्या पाठीवर असलेला फवारणी पंप बिबट्याला अडथळा ठरला. त्यामुळे बिबट्याच्या हल्ल्यापासून त्यांचा बचाव झाला. या घटनेत विद्या शिंदे यांच्या पायाला किरकोळ दुखापत झाली. सुदैवाने दाम्पत्याला गंभीर दुखापत झाली नाही. घटनेची माहिती मिळताच वनपाल गणेश बागडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाकडून तातडीने पिंजरा लावण्यात आला. यावेळी बचाव पथकाचे संतोष कुतळ, रोहित बोडके आणि जयेश भोर उपस्थित होते. बोरी बुद्रुक परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांना शेतात ये-जा करताना जीव मुठीत घेऊन जावे लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वनविभागाने परिसराची सखोल पाहणी करून बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### आळंदीत केशव महाराज कबीरबुवांच्या २९व्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन

**आळंदी : दैनिक संध्या**



वै.ह.भ.प.श्रीगुरु केशव महाराज तथा बापूसाहेब महाराज कबीरबुवा यांच्या २९व्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन शनिवार (ता.१२) ते मंगळवार (ता.१५) सप्टेंबरदरम्यान करण्यात आले आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील वीणा मंडपात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यात दररोज सकाळी गाथाभजन, सायंकाळी प्रवचन आणि सायंकाळी कीर्तन होणार आहे. शनिवार (ता.१२) रोजी ह.भ.प.बळीराम महाराज मेढुंकर, रविवार (ता.१३) ह.भ.प.पंडीत महाराज क्षीरसागर आणि सोमवार (ता.१४) ह.भ.प.माऊली महाराज शिंदे यांची कीर्तनसेवा होणार आहे. मंगळवारी (ता.१५) काल्याचे कीर्तन तसेच सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.चैतन्य महाराज देहूकर यांची कीर्तनसेवा होणार आहे. पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त भाविकांना संतविचार, गाथाभजन, प्रवचन व कीर्तनाचा लाभ घेता येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा व वेद महाराज कबीरबुवा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### शरद दुर्गे यांची जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड

**शिरूर : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीत शिरूर तालुका क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तथा श्री नागेश्वर विद्यालय, निमोणे येथील शिक्षक शरद दुर्गे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीने निमोणे गावाच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, शिरूर तालुक्यातील क्रीडा शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शरद दुर्गे हे निमोणे येथील रहिवासी असून श्री नागेश्वर विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनाची जबाबदारी सांभाळत असतानाच त्यांनी क्रीडा क्षेत्राशी असलेली आपली नाळ कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना व्यासपीठ मिळावे, ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे तसेच क्रीडा शिक्षकांच्या विविध प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शिरूर तालुका क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी तालुक्यातील क्रीडा शिक्षकांना संघटित करून त्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेत पुणे जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेच्या कार्यकारिणीत त्यांच्यावर उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दुर्गे यांच्या निवडीमुळे निमोणेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्राला जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व मिळाले असून, त्यांच्या अनुभवाचा आणि संघटनात्मक कौशल्याचा जिल्ह्यातील क्रीडा शिक्षकांना निश्चितच लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वातून विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासाला तसेच ग्रामीण भागातील क्रीडा चळवळीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातून व्यक्त करण्यात आला. शरद दुर्गे यांच्या निवडीबद्दल शिरूर तालुका क्रीडा शिक्षक मित्र परिवार, शिक्षकवर्ग, क्रीडाप्रेमी तसेच निमोणे परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### अंजीर पिकावर नव्या तांबेरा रोगाचा धोका

**शिरूर : दैनिक संध्या**

पुरंदर परिसरातील अंजीर बागांमध्ये आढळणाऱ्या तांबेरा रोगास कारणीभूत असलेल्या रोगकारकाची ओळख पीडीईएच्या वाघिरे महाविद्यालय, सासवड येथील वनस्पतिशास्त्र विभागाच्या डॉ. विद्या पाटणकर आणि पीएच.डी. संशोधक प्राजक्ता कुलकर्णी यांनी चार वर्षांच्या अभ्यासातून पटवली आहे. या रोगकारकाचे नाव फाकॉपसोरा निशीडाना (Phakopsora nishidana) असे निश्चित करण्यात आले आहे. रोगाची सुरुवात पानांच्या खालच्या बाजूस लालसर-नारिंगी डागांनी होते. पुढे पाने वाकणे, अकाली गळणे आणि फळधारणेत घट अशी लक्षणे दिसून येतात. १०० अंजीर बागांच्या सर्वेक्षणात ७५ टक्के बागांमध्ये तांबेरा रोगाची लागण आढळली, तर ८७ टक्के शेतकऱ्यांनी बुरशीजन्य रोगांमुळे उत्पन्नात मोठी घट झाल्याचे सांगितले. तीव्र प्रादुर्भाव झालेल्या बागांमध्ये दरवर्षी प्रति एकर सुमारे ११ हजार रुपयांचे उत्पादनमूल्य कमी होऊ शकते, तर सरासरी शेतस्तरीय नुकसान सुमारे ४७,३०० रुपये असल्याचा अंदाज संशोधकांनी व्यक्त केला आहे. या अभ्यासात फाकॉपसोरा निशीडाना चा पहिला संपूर्ण जीनोम क्रमही तयार करण्यात आला असून, भविष्यात रोगप्रतिकारक अंजीर वाण विकसित करण्यास आणि प्रभावी रोगव्यवस्थापनास त्याचा उपयोग होऊ शकतो. शेतकऱ्यांनी बागांची नियमित पाहणी करावी, जास्त बाधित पाने व फांद्या काढून नष्ट कराव्यात, छाटणी करून बागेत हवा खेळती ठेवावी आणि पानांवर दीर्घकाळ ओलावा राहणार नाही याची काळजी घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच बुरशीनाशकांची फवारणी करावी. ढगाळ व दमट हवामानात रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.

# रशियन महिलेचे विद्यार्थ्यांना इको-फ्रेंडली गणेशमूर्ती घडविण्याचे धडे!

## पती-मुलांसह गणेश उपासना; 32 वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

**■ पुरंदर (दै. संध्या)**

रशियाची माहेरवाशीण आणि भारताची सून झालेल्या मारीअन्ना विवेक आबनावे यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला आहे. गेल्या ३२ वर्षांहून अधिक काळ जेजुरीत वास्तव्यास असलेल्या मारीअन्ना स्वतःच्या शेतातील शुद्ध मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारतात. पती व मुलांसह गणेशाची उपासना करतानाच त्या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना इको-फ्रेंडली गणेशोत्सवाचे महत्त्व पटवून देत आहेत.

जेजुरी येथील जिजामाता इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांनी कोणत्याही रासायनिक किंवा कृत्रिम मिश्रणाचा वापर न करता शुद्ध शेतमातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कला प्रत्यक्ष शिकविली. अवघ्या दोन तासांत मातीला मंगलमूर्तीचे रूप देत त्यांनी विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती निर्मितीबरोबरच निसर्ग व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कोमल चौगुले उपस्थित होत्या. मारीअन्ना गेल्या सुमारे 32वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करतात. गणेशमूर्तीची स्थापना, धार्मिक व आध्यात्मिक संस्कारांनुसार पूजा-अर्चा तसेच अथर्वशीर्ष पठण यामध्ये त्यांचा परिवारही सहभागी होतो. त्यांचे पती डॉ. विवेक आबनावे हे निवृत्त शासकीय आरोग्य अधिकारी असून मुले निर्मल, अनुराग आणि युगंधरा हेही आईच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे अनुकरण करीत स्वतः गणेशमूर्ती साकारतात. विश्व निर्मल माताजींच्या माध्यमातून डॉ. विवेक आबनावे आणि मारीअन्ना यांचा विवाह झाला. सेंट पीटर्सबर्ग येथील शिरो युनिव्हर्सिटीतून कला शाखेची पदवी घेतलेल्या मारीअन्ना उत्तम चित्रकार असून त्यांनी श्रीगणेशाची अनेक चित्रे साकारली आहेत. त्यांच्या कलाकृती विविध देशांपर्यंत पोहोचल्या आहेत."भारत ही जगातील देवभूमी असून येथील मातीला विशेष दैविक महत्त्व आहे. जगभर परिचित असलेली श्रीगणेशाची उपासना



आणि भारतातील गणेशोत्सव पूर्णपणे प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक व्हावा," अशी भावना मारीअन्ना व्यक्त करतात. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून भारतीय संस्कृती, विविधता आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा उत्सव असल्याचे त्या सांगतात. गणेशाच्या विविध रूपांमधून भारतातील विविध जाती-धर्म आणि संस्कारांचे ऐक्य जपले जाते, असा त्यांचा विश्वास आहे.

दरवर्षी गणेशोत्सवातील भक्तीमय क्षण त्या रशियातील आपल्या आई-वडील व कुटुंबीयांना इंटरनेटच्या माध्यमातून पाठवतात. हिंदी, मराठी, इंग्रजी आणि रशियन या भाषा अवगत असलेल्या मारीअन्ना यांना गणेश अथर्वशीर्षासह खंडोबा स्तोत्रही पाठ आहे.मायदेशापासून हजारो किलोमीटर दूर येऊन भारतीय संस्कृतीशी एकरूप झालेल्या मारीअन्ना यांनी गणेशभक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाची ज्योतही तेवत ठेवली आहे. त्यांच्या या कार्यातून "परंपरेतून पर्यावरण संवर्धनाकडे" असा प्रेरणादायी संदेश समाजासमोर येत आहे



## राजगुरुनगर येथे रानभाज्या महोत्सव २०२६ उत्साहात

**■ राजगुरुनगर (दै. संध्या)**

महिला संघटित झाल्या की शक्ती निर्माण होते. या शक्तीला कौशल्याची जोड मिळाली की उद्योजकता निर्माण होते आणि उद्योजकतेला योग्य बाजारपेठ मिळाली की आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला होतो," या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत राजगुरुनगर येथे रानभाज्या महोत्सव २०२६ उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व पंचायत समिती खेड यांच्या अंतर्गत आयोजित या महोत्सवात तालुक्यातील २३ महिला स्वयंसहाय्यता गटांनी सहभाग घेतला. या गटांनी तयार केलेल्या विविध पारंपरिक खाद्यपदार्थ, रानभाज्या, कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले पदार्थ तसेच महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे विक्री व प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले. महिलांच्या पारंपरिक ज्ञानाला, स्थानिक रानभाज्यांची ओळख, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि उत्पादन कौशल्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. 'स्थानिक उत्पादन–स्थानिक बाजारपेठ–महिला उद्योजकता' या संकल्पनेला चालना देणारा हा उपक्रम ठरला.

महोत्सवात रानभाज्या, चिचुर्डी, चैत्याची भाजी, कोकम कढी, वानवडी, भारंगी, कुर्डूची भाजी, आवळ्याचे लोणचे, शिगुळी, कुरडया, पापड्या, मुगभजी, पुरणपोळी, तूप, मसाले, देशी बियाणे, विविध प्रकारचे धान्य, इडली, मासवडी, पीठ, हेल्दी बिस्किटे, गव्हाचे चॉकलेट, तीळाची चटणी, पालक पापड, ज्यूट बॅग, नैसर्गिक अन्यधान्य, ओट्स, नाचणी आदी उत्पादनांचे स्टॉल्स लावण्यात आले होते.

महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विशाल शिंदे, सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य तनुजा घनवट, दीप्ती भोगाडे, पंचायत समिती सदस्य माऊली ढेरंगे, शंकर कावडे, सारिका गोगावले, श्रद्धा मांडेकर, अश्विनी तरस, दिलीप डुबे, कविता राक्षे, रुपाली कांबळे, गौरी मुऱ्हे पंचायत समिति अधिकारी,कर्मचारी विविध बचत गटातील महिला ,नागरिक उपस्थित होते. ग्रामीण भागातील गरीब व गरजू कुटुंबातील महिलांना संघटित करून त्यांचे सामाजिक, आर्थिक व उपजीविकेच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यरत आहे. खेड तालुक्यात २६४४ स्वयंसहाय्यता समूह कार्यरत असून या समूहाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक महिला जोडल्या गेल्या आहेत.आपल्या कौशल्य आणि श्रमातून स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी प्रदर्शन, विक्री केंद्रे, मेळावे व महोत्सवांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून ग्रामीण महिला बचत गट सदस्या, उद्योजिका, पशुसखी, बँक सखी, ग्रामसखी तसेच 'लखपती दीदी' अशा विविध भूमिकांमधून सक्षम होत असल्याचे यावेळी दिसून आले. या महोत्सवाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र जगदाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसभापती मंगेश सावंत यांनी मानले.

## गणेशोत्सवात नियमांचे पालन करा; लेझर, डीजेचा त्रास झाल्यास कारवाई

**■ राजगुरुनगर (दै. संध्या)**

गणेशोत्सव पर्यावरणपूरक तसेच विसर्जन मिरवणूक शांततेत आणि ध्वनी प्रदूषण मुक्त कराव्यात असे आवाहन खेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांनी शहरातील सार्वजनिक गणपती मंडळे व नागरिकांना केले.

गणेशोत्सव २०२६ स्थानिक प्रशासन यांच्या वतीने गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाली.यावेळी पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण,नायब तहसीलदार चेतन मोरे, मुख्याधिकारी अंबादास गर्कळ, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर,वीज वितरण उत्तम मंचरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक अभिजित कुदळे, पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, विजया शिंदे,नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, पोलिस पाटील संघटना खेड तालुका अध्यक्ष दीपक पावडे, ॲड मनिषा टाकळकर, संपदा सांडभोर, संगीता तनपुरे यांच्यासह तालुक्यातील राजगुरूनगर सह विविध गावाच्या गणेश मंडळाचे अध्यक्ष पोलीस पाटील मंडळाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते, बैठकीच्या सुरुवातीला उपस्थितांनी गणेशोत्सवातील विविध समस्या व उपाय योजनांबाबत सूचना मांडल्या

पोलिस उपअधीक्षक अमोल मांडवे म्हणाले, गणेशोत्सवात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची मंडळांनी काळजी घ्यावी. लेझर लाईट आणि डीजेमुळे नागरिकांना त्रास झाल्यास ते त्याच क्षणी बंद केले जातील. उत्कृष्ट गणेश मंडळांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.नागरिकांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करावा. असे आवाहन केले

पोलिस निरीक्षक, सुभाष चव्हाण म्हणाले गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. गणेश मंडळे, नागरिक आणि प्रशासन यांच्यात योग्य समन्वय असणे आवश्यक असून. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. विसर्जन मिरवणुकीत समाजाच्या भावना दुखावतील असे कृत्य करणाऱ्या मंडळावर त्याच वेळी कडक कारवाई केली जाईल. रस्त्यात मंडप उभारताना वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी आवश्यक परवानगी घ्यावी.

यावेळी राजगुरूनगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माणिक होरे म्हणाले गणेशोत्सवातील गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल व दागिने चोरीच्या घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. तसेच विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर वीज तारांबाबत योग्य खबरदारी घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात

निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे म्हणाले विसर्जनाच्या दिवशी मागील वर्षी चार ते पाच गणेश भक्तांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे गणेश मंडळांनी व भाविकांनी विशेष काळजी घ्यावी. प्रशासनाने घालून दिलेले नियम पाळूनच उत्सव साजरा करावा. महावितरण चे उपअभियंता उत्तम मंचरे यांनी महावितरण आणि गणेशोत्सवाचा जवळचा संबंध आहे. उत्सवाच्या काळात सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक नियोजन केले जाईल. गणेश मंडळांनी अधिकृत वीज जोडणी घ्यावी. मंडळांना तात्पुरती नवीन वीज जोडणी उपलब्ध करून दिली जाईल.

यावेळी विविध मान्यवर तसेच अनेक मंडळाचे प्रतिनिधी, पोलीस पाटील यांनी आवश्यक सूचना बैठकीत मांडल्या. सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळुक यांनी केले. पोलिस हवालदार संतोष घोलप यांनी आभार मानले

गणेश मंडळांना नगरपरिषदेच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य केले जाईल. राजगुरुनगर शहरातील गणेशोत्सव हा तालुक्यात महत्त्वाचा उत्सव आहे.

सर्वांनी उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने चांगला उत्सव साजरा करावा, असे मंगेश गुंडाळ, नगराध्यक्ष, राजगुरूनगर नगर परिषद यांनी सांगितले.

नगरपरिषदेच्या माध्यमातून गणेशोत्सवाची पूर्वतयारी करण्यात आली आहे. रस्त्यावर मंडप उभारताना नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होणार नाही, याची मंडळांनी काळजी घ्यावी.

देखावे कायदेशीर तसेच सांस्कृतिक स्वरूपाचे असावेत. चांगले सामाजिक उपक्रम राबवावेत. निर्माल्याची स्वतंत्र व्यवस्था केली जाणार असून त्यातच निर्माल्य टाकावे. विसर्जन मिरवणुका लवकर सुरू करून लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. तसेच मूर्तीदान करण्यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा., असे अंबादास गर्कळ, मुख्याधिकारी, राजगुरूनगर नगर परिषद. यांनी सांगितले.

## फेरफारच्या नकलींसाठी नागरिकांची फरफट

**■ शिरूर (दै. संध्या)**

शिरूर तहसील कार्यालयातील अभिलेख शाखेत फेरफारच्या नकला व इतर महसूलविषयक कागदपत्रे मिळण्यास विलंब होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अर्ज करूनही वेळेत कागदपत्रे उपलब्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, अभिलेख कक्षातील अनधिकृत वावराचाही मुद्दा ऐरणीवर आला आहे.

दत्तात्रय पडवळ यांनी ४ ऑगस्ट, तर सुरेश भुजबळ यांनी १३ ऑगस्ट रोजी फेरफारच्या नकलांसाठी अर्ज केला होता. मात्र, संबंधित कागदपत्रे अद्याप मिळालेली नसल्याचा दावा ॲड. सागर दरेकर यांनी केला आहे. महसूल सहाय्यक संजू गोणे यांच्याकडून या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही दरेकर यांनी केला आहे.

महसूल विभागाकडून नागरिकांना नियमानुसार आणि विहित वेळेत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात नागरिकांना एकाच कामासाठी पुन्हा-पुन्हा कार्यालयात जावे लागत असल्याचे चित्र असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे 'शासकीय कार्यालयात काम करून घेण्यासाठी नागरिकांनी किती हेलपाटे मारायचे?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षात फेरफार नोंदी, जुने अभिलेख तसेच विविध महत्त्वाची महसूलविषयक कागदपत्रे जतन केली जातात. त्यामुळे या कक्षात अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश होऊ नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. मात्र, अभिलेख कक्षात विनापरवाना अनेकांचा वावर होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकाराची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी.

## मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे हॉकर्स जॉईंट ॲक्शन कमिटीतर्फे स्वागत

**■ पुरंदर(दै. संध्या)**

फेरीवाले आणि स्ट्रीट व्हेंडर्सच्या हक्कांसाठी लढणाऱ्या हॉकर्स जॉईंट ॲक्शन कमिटी, महाराष्ट्रने मुंबई उच्च न्यायालयाने फेरीवाल्यांच्या प्रश्नावर दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्देशांचे स्वागत केले आहे.

राज्यात Street Vendors Act, 2014 ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्य सरकारने तयार केलेली मसुदा फेरीवाला योजना (Draft Scheme) जाहीर करावी आणि महानगरपालिका, नगरपालिका, Town Vending Committee व फेरीवाला संघटनांकडून सूचना-हरकती मागवून अंतिम योजना करावी, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत. "फेरीवाल्यांच्या सहभागाशिवाय फेरीवाला धोरण नको" अंतिम योजना बनवताना प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि मसुदा योजना तात्काळ जाहीर करून हरकती नोंदवण्याची संधी द्यावी, अशी मागणी कमिटीने केली आहे.

कारवाईत जप्त केलेले हातगाडे, माल याची पावती, रेकॉर्ड आणि ठराविक वेळेत परत करण्याची समान प्रक्रिया संपूर्ण राज्यात लागू करावी. तसेच तक्रार निवारण समित्या (Grievance Redressal Committee) प्रत्यक्षात कार्यान्वित कराव्यात. कमिटीच्या प्रमुख १० मागण्या: १. कोर्टाने दिलेल्या मुदतीत राज्यस्तरीय योजना अधिसूचित करावी २. मसुदा योजना तात्काळ जाहीर करावी ३. फेरीवाला संघटनांकडून सूचना मागवाव्यात ४. सर्वेक्षणातून वगळलेल्या खऱ्या फेरीवाल्यांचा समावेश करावा ५. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय बेदखल करू नये ६. Town Vending Committees कार्यान्वित कराव्यात ७. तक्रार निवारण समित्या तात्काळ सुरू कराव्यात ८. जप्त माल परत करण्यासाठी स्पष्ट नियम करावेत ९. कायद्यानुसार Vending Zone निश्चित करावेत १०. Street Vendors Act, 2014 ची राज्यात काटेकोर अंमलबजावणी करावी.

"आम्ही कायद्याचा आणि शहराच्या व्यवस्थेचा आदर करतो, पण शहराचे नियोजन करताना गरीब फेरीवाल्यांची उपजीविका हिरावून न घेता त्यांना कायद्यानुसार सुरक्षित व्यवसायाची संधी द्यावी. असे संजय शंके, कमिटी अध्यक्ष तथा कार्यवाह जाणीव हॉकर्स संघटना यांनी सांगितले. राज्य सरकार आणि नगरविकास विभागाशी संवाद साधून न्याय्य मागण्या मांडल्या जातील, असे यांनी संतोष खतावकर, कमिटी सचिव सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे




## रेल्वे तिकिट दुनियेतील विचित्र घोटाळ्याची विनोदी मांडणी

मुंबई : दैनिक संध्या

प्रतीक्षा यादीत खोळंबून ‘कंफर्म तिकीट’साठी नकार मिळाल्याने येणारी निराशा प्रत्येक भारतीय प्रवाशाने कधीतरी अनुभवली आहे. परंतु एखाद्याला, कुठला तरी ‘मध्यम-मार्ग’ सापडतो – ती ‘युक्ती’ अखेरीस देशव्यापी घोटाळा बनली तर? खास ओरिजिनल्ससाठी भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राईम व्हीडिओने आज त्यांच्या आगामी एमएक्स ओरिजिनल ‘वेटिंग है’ या एका विचित्र, घोटाळा नाटकाच्या ट्रेलरचे अनावरण केले. आपल्या सर्वांना परिचित असलेली ‘तिकीट बुकिंग’ची डोकेदुखी आणि तिचे उंदीर-मांजराच्या खेळात झालेले रुपांतर हा मूळ गाभा आहे. पाटणा येथे घडणाऱ्या या मालिकेत दिव्येंदु आणि भुवन अरोरा समोरासमोर उभे राहतात. जिथे एका चतुर ‘हॅक’ची कल्पना कोणीही करू शकत नाही. पुढे जाऊन ही जोखीम अतिशय मोठी होती. जिओ स्टुडिओ प्रेझेंटेशन आणि जार पिक्चर्स प्रॉडक्शनची ही सिरीज राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते आणि मालिका दिग्दर्शक समीर विद्वांस यांनी दिग्दर्शित केली आहे. यात हर्षिता गौर, कुमुद मिश्रा, विजय मौर्य, सृष्टि तारे आणि सुनीता राजवार यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. ज्योती देशपांडे आणि अजय राय निर्मित 'वेटिंग है' मध्ये घोटाळ्याच्या शैलीला एक विशिष्ट देशी वळण लावले आहे. या सिरीजचे कथासूत्र रेल्वे तिकीट आरक्षणाच्या जगात विनोद आणि भावनांचा वेध घेते. ट्रेलरमध्ये सुगम मिश्रा प्रेक्षकांसमोर येतो. ज्याची भूमिका दिव्येंदु यांनी रेल्वे कॉन्स्टेबलच्या रूपात साकारली आहे. हा सुगम मिश्रा एका आव्हानात्मक नवीन नोकरीमध्ये पाय रोवण्याचा प्रयत्न करतो आहे. एक हाताळायला कठीण, नवीन बॉससमवेत जुळवून घेताना दिव्येंदुने साकारलेली ही व्यक्तिरेखा घरातील गोंधळाला देखील सामोरे जात आहे. दुसऱ्या बाजूला अफरोज हमसा हे पात्र आहे. ज्याची भूमिका भुवन अरोरा याने साकारली आहे. हा अफरोज एक तंत्रज्ञ आहे आणि व्यवस्थेतून मार्ग शोधतो. लवकरच, दोघेही खेळाच्या विरुद्ध बाजूना उभे राहतात आणि हे त्यांच्याही नकळत घडते. रेल्वे तिकिटे काही सेकंदात नाहीशी होत असताना आणि एजंटची गर्दी कमी होत असताना, सुगमला संशय येऊ लागतो की व्यवस्थेत कुठेतरी पाणी मुरते आहे. सुगम हा त्याची पत्नी प्रिन्सी (जिची भूमिका हर्षिता गौरने साकारली आहे) परिस्थितीच्या आणखी खोलवर जाण्यास प्रवृत्त करत असताना अफरोजचा माग काढायला सुरुवात करतो. सुगम हा सत्याच्या जितका जवळ येऊन पोहोचतो, तितकेच अफरोजला पकडणे कठीण होऊन बसते. एका क्षणी सुगमला वाटते की शेवटी त्याच्या हातात नियंत्रण आले आहे, तेव्हा बुकिंग विंडो उघडल्यानंतर काही सेकंदातच रेल्वे तिकिटं ‘कंफर्म’ होत असल्याचे त्याच्या लक्षात येते. ज्यामुळे तो पुढील तपास करण्यास प्रवृत्त होतो. आता प्रश्न असा आहे की- हे रॅकेट किती खोलवर रुतले आहे आणि प्रत्यक्षात त्याची सूत्र कोणाच्या हातात आहेत.

## फ्लिपकार्ट मिनिट्स चा दुसरा वर्धापनदिन ४ पट वाढीने साजरा, १५० हून अधिक शहरांत पोहोच

मुंबई : दैनिक संध्या

फ्लिपकार्ट मिनिट्स या फ्लिपाकार्टच्या क्विक कॉमर्स उपक्रमाने ऑगस्ट २०२४ मध्ये सुरुवात करुन आपल्या कार्याचा दुसरा वर्धापनदिन साजरा केला जात असून वार्षिक तुलनेत या उपक्रमाने ४ पट वाढ नोंदवत १५०+ अधिक शहरात १२०० हून अधिक मायक्रो फुलफिलमेंट सेंटर्सची स्थापना केली आहे. या मंचाच्या माध्यमातून सुरुवातीपासून आजमितीस ४ लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती केली असून अंदाजे ६० टक्क्यांहून अधिक ग्राहक हे फ्लिपकार्ट मिनिट्स कडे पुन्हा येत आहेत, यांतून असे दिसून येथे की देशभरांत क्विक कॉमर्स चा वापर अधिक प्रमाणात होत आहे. टिअर २ + बाजारपेठा या वाढीमध्ये मोठे योगदान देत असून ग्राहकांची संख्या ही वार्षिक तुलनेत २५पटींनी वाढली असून यांत अंबाला, बाराबांकी, भागलपूर, दुर्गापूर, कानपूर, रुडकी, सिलिगुडी, सालेम आणि तिरुपूर यांची समावेश आहे. या बाजारपेठांमधील मागणी ही केवळ रोजच्या गरजांसाठी सिमीत नसून कोरियन नुडल्स, सॉसेस आणि रेडी टू इट जेवणासह प्रिमियम स्कीनकेअर आणि पर्सनल केअर विभागांमध्ये ही वाढू लागली आहे. जेन झीं नी फ्लिपकार्ट मिनिट्स च्या ग्राहकांमध्ये मोठे योगदान दिले असून ग्राहकांच्या बेस मध्ये गेल्या बारा महिन्यांत वार्षिक तुलनेत ५ पट वाढ दिसून आली. जेन झी हे ४५ टक्क्यांहून अधिक ऑर्डर देणारे असून ब्युटी, इलेक्ट्रॉनिक्स, गेमिंग, वेअरेबल्स, सुगंध, हेल्थ अ‍ॅन्ड न्युट्रिशन आणि ग्रुमिंग विभागात ते अधिक खरेदी करतात तर मंचावरील ३ पैकी १ ऑर्डर ही खाद्यपदार्थांची असते. डेटा दर्शवतो की एक पिढी दैनंदिन गरजेच्या वस्तूंपासून ते प्रीमियम आणि महत्त्वाकांक्षी श्रेणींपर्यंत, उत्पादनांच्या खूप व्यापक श्रेणीसाठी क्विक कॉमर्सचा वापर करत आहे.

## राइज अँड फॉल’ सीझन 2चा सूत्रसंचालक म्हणून वीरेंद्र सेहवागचे स्ट्रीमिंगमध्ये पदार्पण

मुंबई : दैनिक संध्या

जे वर जाते ते खाली येतेच. पण ‘राइज अँड फॉल’मध्ये खरा प्रश्न आहे, ते कधी खाली येणार हे ठरवणार कोण? सीझन 1मधील सत्ता मिळवण्याच्या चुरशीच्या खेळाने प्रेक्षकांना खिळवून ठेवल्यानंतर प्राइम व्हिडिओने आज ‘राइज अँड फॉल सीझन 2’ची पहिली झलक सादर केली. यावेळी ‘सुलतान ऑफ मुलतान’ वीरेंद्र सेहवाग सूत्रसंचालकाची सूत्रे हाती घेणार आहे. निर्भीड फलंदाजी, हजरजबाबीपणा आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखला जाणारा सेहवाग या शोमधून स्ट्रीमिंगमध्ये पदार्पण करत आहे. स्कोअरकार्ड बदलण्यापेक्षाही वेगाने नशीब बदलू शकणाऱ्या या गेममध्ये सेहवागच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाचीही झलक पाहायला मिळणार आहे. प्रोमोच्या सुरुवातीला वीरेंद्र सेहवाग आपल्या खास मिश्कील शैलीत आयुष्यातील चढ-उतारांवर भाष्य करताना दिसतो. त्यानंतर तो ‘राइज अँड फॉल’ सीझन 2च्या अनिश्चिततेने भरलेल्या जगात प्रवेश करतो. या गेममध्ये बरेच काही पणाला लागलेले आहे आणि कोणाचेही स्थान कायमचे निश्चित नाही. प्रत्येक चेंडूचे संधीत रूपांतर करणारा आणि कोणतेही आव्हान स्वीकारण्यास कधीही मागे न हटणारा सेहवाग आता अशा गेममध्ये उतरला आहे, ज्याचे नियम मात्र पूर्णपणे वेगळे आहेत.


# अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महानगर पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि अतिक्रमण मुख्य कार्यालय उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व १० क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या या कारवाईत एकत्रितपणे सुमारे ८३ हजार ९९ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये आर.सी.सी. स्वरूपाची अनधिकृत बांधकामे, अनधिकृत पत्राशेड, नव्याने सुरू असलेली बांधकामे तसेच पदपथावरील अनधिकृत टपऱ्या, हातगाडे आणि इतर अतिक्रमणांचा समावेश आहे. अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील साईनगर, निगडी परिसरात अंदाजे ३ हजार ४९८ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील शगुन चौक, पिंपरी मार्केट, एम्पायर ब्रिजखाली चिंचवड आणि वाल्हेकरवाडी परिसरात १० हजार ५३८ चौरस फूट क्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. क क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत चिखली, कुदळवाडी, शिवरोड, रवी रंजन वजन काटा चिखली आणि डी-मार्ट शेजारी चिंचवड परिसरात १२ हजार ७२३ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ५ हजार ४०० चौरस फूट, तर ई क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी व मोशी परिसरात ७ हजार ९६५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या मोरे वस्ती, चिखली, तळवडे आणि नेवाळे वस्ती परिसरात सर्वाधिक १९ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

क्षेत्रीय कार्यालयाच्या राजवाडे नगर, गोकुळवाडी, पवनानगर, स्वप्नगरी कॉलनी, काळेवाडी, डोंगरे कॉर्नर, मंगल नगर आणि थेरगाव परिसरात १३ हजार ३५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली.



## अपर मुख्य सचिव चंद्र यांना 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

■ मुंबई (दै. संध्या)

ऊर्जा परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जेद्वारे शेतीला दिवसा वीज तसेच ग्रामीण अर्थकारणाला बळ, गुंतवणूक व रोजगार संधी, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्त आदींच्या माध्यमातून महावितरणने देशाच्या वीज क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या नेतृत्वासाठी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचा ‘एनर्जी लिडरशिप अवॉर्ड’ने तसेच वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी तंत्रज्ञानासाठी महावितरणचा ‘ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड’ने गुरुवारी (दि. १०) गौरव करण्यात आला.

भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि भविष्यातील दिशा यावर मंथन करण्यासाठी '६ व्या ईटी एनर्जी लीडरशिप समिट २०२६' चे नवी दिल्ली येथे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय परिषदेत ऊर्जा क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र व विविध राज्य सरकारचे तसेच वीज क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे प्रमुख, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान



पुरवठादार आदींची उपस्थिती होती. यावेळी श्री. लोकेश चंद्र यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सौर ऊर्जेच्या माध्यमातून बदलणारे ग्रामीण अर्थकारण, गुंतवणूक, रोजगार, शेतीसाठी दिवसा वीज आणि इतर सकारात्मक बदलांची माहिती दिली. या परिषदेत सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव श्री. लोकेश चंद्र यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर महावितरणचा पुरस्कार श्री. लोकेश चंद्र यांच्यासह कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. संतोष सांगळे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी यांनी स्वीकारला. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री ना. मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी अपर मुख्य सचिव श्री. लोकेश चंद्र यांचे तसेच महावितरणच्या सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी महावितरणचा चेहरामोहरा बदलला आहे. ऊर्जा परिवर्तनामुळे महावितरणच्या वीजदरात प्रथमच कपात करण्यात आली असून येत्या वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे आतापर्यंत ६२५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प पूर्ण झाले असून १७ लाख ५२ हजारांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे. यासोबतच पीएम कुसुम-बी अंतर्गत देशात आजमितीस १७ लाख ४२ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात तब्बल ६५ टक्के म्हणजे ११ लाख ५४ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर योजनेसाठी महावितरणला केंद्र शासनाचे नुकतेच आठ पुरस्कार मिळाले आहेत.

## वैष्णवी कुलकर्णीची ‘सीएस’ पदी यशस्वी झेप

■ बारामती : (दै. संध्या)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीच्या वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी कु. वैष्णवी महेश कुलकर्णी हिने पदवी शिक्षणासोबतच कंपनी सेक्रेटरी (Company Secretary) या व्यावसायिक अभ्यासक्रमात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जून २०२६ मध्ये झालेल्या CS Professional Programme परीक्षेत दोन्ही गट यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून तिने कंपनी सेक्रेटरी होण्याचे आपले स्वप्न साकार केले आहे.

वैष्णवीने २०२३ मध्ये CSEET परीक्षा उत्तीर्ण करून कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमाच्या प्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर २०२४ मध्ये CS Executive चे दोन्ही गट यशस्वीरीत्या उत्तीर्ण केले. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने जून २०२६ मध्ये CS Professional चे दोन्ही गट उत्तीर्ण केले. Professional Programme च्या Group 1 मध्ये तिने २०५ गुण, तर Group 2 मध्ये १५५ गुण मिळविले. कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमाचा पाठपुरावा करण्यासाठी तुळजाराम




चतुरचंद महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रेरणा वैष्णवीसाठी महत्त्वपूर्ण ठरली. महाविद्यालयात वाणिज्य शाखेचे शिक्षण घेत असताना शिक्षकांनी तिला कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमाची माहिती दिली तसेच हा अभ्यासक्रम करण्यासाठी प्रोत्साहित केले. अभ्यासक्रम समजून घेण्यासाठी आणि सातत्याने त्याचा पाठपुरावा करण्यासाठी शिक्षकांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण आणि शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळे तिला बी.कॉम.च्या शिक्षणासोबत CS अभ्यासक्रमाचा यशस्वीपणे पाठपुरावा करता आला.

## भव्य हरिहर मंदिरात विराजमान होणार अखिल मंडई मंडळाचे शारदा गणेशोत्सवाचे १३३ वे वर्ष

■ पुणे : (दै. संध्या)

भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या एकात्म स्वरूपाचे प्रतीक असलेल्या ‘हरिहर’ संकल्पनेवर आधारित भव्य मंदिराची उभारणी अखिल मंडई मंडळाकडून यंदाच्या गणेशोत्सवासाठी करण्यात येत आहे. शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंड तसेच शिव-विष्णूच्या समन्वयाचे दर्शन घडविणाऱ्या या काल्पनिक मंदिराच्या माध्यमातून भक्तांना ऐक्य, समरसता आणि परस्पर सन्मानाचा संदेश देण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली.

अखिल मंडई मंडळाच्या उत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. हरिहर मंदिराची ही संकल्पना भगवान विष्णू अर्थात ‘हरि’ आणि भगवान शिव अर्थात ‘हर’ यांच्या एकात्म स्वरूपावर आधारित आहे. पालनकर्ता विष्णू आणि परिवर्तनाचे अधिष्ठाता भगवान शिव यांचे हे एकत्रित रूप विविधतेत एकतेचा संदेश देणारे आहे.

तब्बल ९० बाय ६० फूट आकाराच्या मंडपात २५ फूट उंचीचे हे मंदिर पूर्णपणे फायबरमध्ये साकारण्यात आले असून, देखाव्याची भव्यता भाविकांचे लक्ष वेधून घेणार आहे.

या मंदिरामध्ये शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंड यांसह हिंदू धर्मातील विविध पवित्र प्रतीकांचा समावेश करण्यात आला आहे.

पारंपरिक मंदिराची रचना, धार्मिक प्रतीके आणि सजावटीच्या माध्यमातून शैव आणि वैष्णव परंपरांचा सुंदर समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या भव्य मंदिराची कलात्मक संकल्पना आणि निर्मिती कलादिग्दर्शक विशाल ताजनेकर आणि गजेंद्र पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. संपूर्ण मंदिर फायबरमध्ये साकारण्यात आले असून, २५ फूट उंचीमुळे त्याची भव्यता अधिक उठून दिसणार आहे. अण्णा थोरात म्हणाले, हरिहर मंदिराची संकल्पना ही भगवान शिव आणि भगवान विष्णू यांच्या एकात्मतेचा संदेश देणारी आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तांमध्ये ऐक्य भावना निर्माण व्हावी, हा या देखाव्यामागील उद्देश आहे.

## रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल च्या संघाचा विजय

■ नारायणगाव (दै. संध्या)

तालुकास्तरीय १४ वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेत रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत पेनल्टी शूटआऊटमध्ये ४–१ असा दणदणीत विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत झाली. सामना पेनल्टी शूटआऊटपर्यंत पोहोचला. निर्णायक क्षणी रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल च्या खेळाडूंनी आत्मविश्वास व संयम राखत ४–१ असा विजय मिळवून विजेतेपदावर आपले नाव कोरले. या विजयी संघात मयंक खिंवसरा, विश्वजीत शिंदे, कृष्णा कुऱ्हाडे, विघ्नेश शिरोळे, रुद्र गुंजाळ, अनुज काशिदे, टी. एस. मधिवनन, विरेन कोठारी, जय सुपे, रुद्र गावडे, जैनम संचेतीया, वर्धन मुसळे, तन्मय भुजबळ, ओम भुजबळ, शिवांश खरात आणि यज्ञेश अरगडे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या उल्लेखनीय यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. गणेश कणसे सर यांचे मार्गदर्शन, नियोजन आणि अथक मेहनत महत्त्वाची ठरली. विद्यार्थ्यांना नियमित सराव, योग्य तंत्र, सांघिक समन्वय आणि सामन्याच्या परिस्थितीत आत्मविश्वासाने खेळण्याचे मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शाळेचे संचालक यांचे मोलाचे सहकार्य तसेच प्राचार्या सौ. वर्षा मदभावीकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याला वाव देत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांच्या या शानदार कामगिरीबद्दल रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल चे संचालक, प्राचार्या वर्षा मदभावीकर, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि पालकांनी विजयी संघ तसेच गणेश कणसे सरांचे अभिनंदन केले. या विजयामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. जिद्द, मेहनत, संघभावना आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर मिळविलेल्या या विजयामुळे विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.



# ‘एआय’ मॉड्यूलने महावितरणचा वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक

■ पिंपरी (दै. संध्या)

वीजचोरीविरोधी तडाखा देण्याच्या मोहिमेमध्ये महावितरणने आता ‘एआय’च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक सुरु केला आहे. तब्बल १९० भरारी पथकांकडून वीजजोडण्यांची तपासणी आणि ‘एआय’ मॉड्यूलच्या सूक्ष्म विश्लेषणातून गेल्या तीन महिन्यात ६६ कोटी २८ लाख रुपयांच्या २७ हजार ९६४ वीजचोऱ्यांचा पर्दाफाश झाला आहे. आतापर्यंत वीजचोरी व तडजोड शुल्काची रक्कम न भरलेल्या २८९ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वीजचोरीविरोधी पारंपरिक तपासणीसोबतच महावितरणने आता हायटेक मोहीम उघडली आहे. यासाठी थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'मशीन लर्निंग'चा वापर करून वीजचोरीचे अचूक भाकित करणारे मॉड्यूल तयार केले आहे. वीजग्राहकांचा किंवा परिसरातील वीज वापराचा जुना आलेख, अचानक घटलेली किंवा वाढलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार आणि इतर ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे हे मॉड्यूल २४ तास सूक्ष्म विश्लेषण करत आहे. ज्या ग्राहकांच्या वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळत आहे त्या ग्राहकांना हे ‘एआय’चे मोड्यूल 'हाय-रिस्क' श्रेणीत टाकत आहे. त्यामुळे कोणत्याही तपासणीशिवाय थेट चोरी होणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती या मॉड्यूलद्वारे उपलब्ध होत आहे.

‘एआय’च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरीच्या ठिकाणांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे राज्यभरात १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजचोरीविरोधी धडक कारवाईत कुठेही हयगय होऊ नये यासाठी वीजजोडण्यांच्या तपासणीपासून ते वीजबिलांच्या आकारणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया 'थेफ्ट ट्रॅकिंग ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी एक स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. वीजचोरीचे ठिकाण ते तपासणीचे लाईव्ह फोटो, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे आणि दंडात्मक बिलांची वसूली करेपर्यंतची सर्व माहिती या ॲपमध्ये रिअल-टाईम अपडेट केली जात आहे. त्यामुळे कारवाईत अत्यंत पारदर्शकता आणि वेग आला आहे.

गेल्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत महावितरण अंतर्गत संवसु विभाग आणि सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या नियमित व विशेष पथकांनी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात ५ हजार ८३, कोकण- ११ हजार ८३, नागपूर- ५ हजार ९४९ आणि पुणे प्रादेशिक विभागात ५ हजार ८४९ अशा एकूण २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघड केल्या आहेत. त्यातील २४ हजार ५०८ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत वीजचोरीच्या बिलांपोटी १० हजार ८१० प्रकरणांत २९ कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा तडजोड शुल्कासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८९ प्रकरणांत कलम १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

श्री. लोकेश चंद्र (मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण) - ‘येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला प्राधान्य देत विजचोरीविरुद्ध धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी ‘एआय’ मॉड्यूल विकसित करण्यात आले असून त्याद्वारे वीजचोरीविरुद्धची धडक कारवाई आणखी तीव्र व अचूक करण्यात आली आहे.’

## थोडक्यात पण महत्वाचे



### क्रांतिवीर लहुजी सेनेतर्फे अधिकाऱ्यांच्या विरोधात हांडी फोडो आंदोलन

पुणे : दैनिक संध्या

क्रांतिवीर लहुजी सेनेतर्फे पुणे शहर परिमंडल महावितरण मधील बंनगार्डन डिव्हिजन अंतर्गत व पर्वती डिव्हिजन अंतर्गत अधिकाऱ्यांनी केलेल्या कथित भ्रष्टाचाराबद्दल यांच्या विरोधात भ्रष्टाचाराची हांडी फोडो आंदोलन रास्ता पेठ येथील महावितरण कार्यालय समोर करण्यात आले होते. महावितरणचे आर्थिक नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात व त्यांना पाठीशी घालणाऱ्या मुख्य अभियंता. अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी क्रांतिवीर लहुजी सेने तर्फे करण्यात आली या संदर्भाचे निवेदन क्रांतिवीर लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भोसले यांनी प्रशासन कार्यकारी अभियंता सुरेश रामदास खाकसे यांना देण्यात आले. या आंदोलनामध्ये बाळासाहेब मोहिते, महेश सकट, सुरज खंडाळे, निलेश वाघमारे, रोहित अवघडे, लोंढे ताई आदी उपस्थित होते.

### कोळविहिरे येथे घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट; जीवितहानी टळली

जेजुरी : दैनिक संध्या

कोळविहिरे येथील लव्हाळेवस्ती परिसरात शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर २०२६) रात्री



साडेआठ वाजण्याच्या सुमारास घरातील स्वयंपाकघरात गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत घरावरील पत्रे उडून जाऊन घराचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याचे प्राथमिक माहितीनुसार समोर आलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, सीमा रंगनाथ लव्हाळे या रात्रीच्या सुमारास घरातील स्वयंपाकघरात स्वयंपाक करीत असताना गॅसच्या रेग्युलेटरला आग लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिस्थिती लक्षात येताच त्या घराबाहेर आल्या. त्यानंतर काही वेळातच घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याचे सांगण्यात आले. स्फोटामुळे घरावरील पत्रे उडून गेले असून,घरातील काही साहित्याचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या घटनेची प्राथमिक माहिती सीमा रंगनाथ लव्हाळे यांचा मुलगा प्रणव लव्हाळे यांनी दिली आहे. दरम्यान, घटनेची अधिकृत पाहणी व पंचनामा संबंधित यंत्रणेकडून करण्यात येणार असून पंचनामा व संबंधित यंत्रणेच्या तपासणीनंतर नुकसानीचे नेमके स्वरूप तसेच घटनेचे कारण अधिकृतरीत्या स्पष्ट होणार आहे.

### जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

जेजुरी : दैनिक संध्या

पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार सोहळा शनिवार (ता. १२) रोजी पुणे येथील अण्णाभाऊ साठे सभागृहात उत्साहात संपन्न झाला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा यावेळी जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमास पुणे जिल्हा परिषदचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, सकाळ वृत्तपत्र पुणेचे सहयोगी संपादक महेश बर्दापूरकर, राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजी कामठे, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, उपाध्यक्ष कल्याण बरडे, विद्या सचिव भानुदास रिठे, अध्यक्ष सुधाकर जगदाळे, विश्वस्त हनुमंत कुबडे, शिवाजीराव किलकिले, महामंडळाचे माजी सचिव आदिनाथ थोरात उपस्थित होते. कार्यक्रमाचे पुणे शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शिवाजी शिंदे, सचिव किशोर बोरसे, कार्याध्यक्ष दिलीप काळे आणि पुणे शहर मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी यांनी आयोजन केले. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारार्थींचा सन्मान करण्यात आला. गुणवंतांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या योगदानामुळे शिक्षण क्षेत्राला नवी प्रेरणा मिळत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच संघाचे विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या शहर, तालुका अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने पुरस्कार सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. पुरस्कारार्थी मुख्याध्यापक अजित लेंभे, दीपा व्यवहारे व मीरादेवी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसाद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी शिंदे व किशोर बोरसे तर आभार शिवाजी कामथे यांनी केले.

# भटक्या-विमुक्त समाजांच्या पुनर्वसनाला सकारात्मक दिशा

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे ठोस आश्वासन; विजय वडेट्टीवार यांच्या मध्यस्थीने बैठक

■ पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील भटक्या व विमुक्त जाती-जमातींमधील मरीआई, नाथपंथी डवरी गोसावी, भराडी, वासुदेव, गोंधळी आणि नंदीवाले या समाजघटकांतील निवाऱ्याविना व अत्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या पुनर्वसनाला आता सकारात्मक दिशा मिळाली आहे.

येवलेवाडी येथे वास्तव्यास असलेल्या मरीआई समाजातील सुमारे ५० गोरगरीब कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते मा. श्री. विजय वडेट्टीवार साहेब यांच्या मध्यस्थीने पुणे जिल्हाधिकारी मा. जितेंद्र डुडी साहेब यांच्यासमवेत शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक झाली.

या बैठकीत संबंधित कुटुंबांची सामाजिक, आर्थिक व निवासाची परिस्थिती सविस्तरपणे मांडण्यात आली. यावेळी येवलेवाडी येथील सदर जागेवरच कायदेशीर प्रक्रियेच्या अधीन राहून पुनर्वसन करण्याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ठोस आश्वासन दिले.



विशेष म्हणजे, केवळ जागा उपलब्ध करून न थांबता घर उभारण्यासाठी आवश्यक निधी विविध शासकीय फंडातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्न करेल, असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. तसेच "या गोरगरीब कुटुंबांसाठी मी स्वतः ₹१ लाखांची मदत करणार," अशी संवेदनशील घोषणा त्यांनी केली. त्यांच्या या भूमिकेचे उपस्थित शिष्टमंडळाने टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

पुनर्वसनासाठी महसूल विभाग, वन विभाग व संबंधित शासकीय यंत्रणांमध्ये तत्काळ चर्चा सुरू झाली असून, प्रत्येक पात्र कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी प्रशासन सकारात्मक पावले उचलत आहे.

या बैठकीत ओबीसी समाजाचे नेते व भटक्या-विमुक्त समाजाचे मार्गदर्शक ॲड. मंगेश ससाणे साहेब यांनी समाजाची कायदेशीर, सामाजिक व मानवी बाजू प्रभावीपणे मांडली. तर भैरव क्रांती सेनेचे प्रदेशाध्यक्ष विजय सुदामराव जाधव यांनी सर्व लाभार्थी कुटुंबांची सविस्तर माहिती प्रशासनासमोर मांडून महसूल विभागाच्या आतापर्यंतच्या सकारात्मक कार्यवाहीचे कौतुक केले.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी कॅबिनेट मंत्री मा. नामदार अतुल सावे साहेब यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तसेच भैरव क्रांती सेना आणि जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून या भटक्या-विमुक्त कुटुंबांच्या हक्काच्या घरासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. देश स्वतंत्र होऊन अनेक दशके उलटल्यानंतरही निवाऱ्याविना जीवन जगणाऱ्या या भटक्या-विमुक्त समाजातील गोरगरीब कुटुंबांना आता स्वतःच्या हक्काच्या घरात सन्मानाने राहण्याची आशा निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे येवलेवाडी परिसरात आनंदाचे वातावरण असून, हक्काचे घर मिळण्याच्या आशेने संबंधित कुटुंबांमध्ये आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संविधानातील सामाजिक न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणारी ही सकारात्मक सुरुवात असून, प्रत्येक पात्र भटक्या-विमुक्त कुटुंबाला हक्काचे व सुरक्षित घर मिळेपर्यंत भैरव क्रांती सेना व जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्थेचा पाठपुरावा सुरूच राहणार आहे, अशी भूमिका प्रदेशाध्यक्ष विजय जाधव यांनी व्यक्त केली.

# आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे हद्दीत मॉकड्रिल

■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे हद्दीत कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा तात्काळ व प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने मॉकड्रिल घेण्यात आले.

गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी,गणेश विसर्जन मिरवणुका,वाहतूक कोंडी तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास पोलीस यंत्रणेचा जलद, समन्वयपूर्ण व ठोस प्रतिसाद राहावा,हा या मॉकड्रिलचा प्रमुख उद्देश होता.

मॉकड्रिलदरम्यान आपत्कालीन परिस्थितीची माहिती मिळताच पोलीस अधिकारी व अंमलदारांनी त्वरित घटनास्थळी दाखल होऊन परिस्थितीचा आढावा घेणे, परिसर सुरक्षित करणे,गर्दीवर नियंत्रण मिळविणे व आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा



प्रत्यक्ष सराव केला.

तसेच उपलब्ध पोलीस मनुष्यबळाचा योग्य वापर, घटनास्थळी बंदोबस्ताचे नियोजन आणि विविध पथकांमध्ये प्रभावी समन्वय साधण्याची कार्यपद्धती तपासण्यात आली.

कोणत्याही परिस्थितीत नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी व कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे राखता यावी,यासाठी वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे पूर्णपणे सज्ज व सतर्क असल्याचे या मॉकड्रिलच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

गणेशोत्सव काळात नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित वातावरणात व उत्साहात साजरा करावा, असे आवाहन वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात येत आहे.



### हरियाणातील सफाई कर्मचाऱ्यांवर झालेल्या मारहानीचा मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने निषेध

■ पुणे (दै. संध्या)

वेतन वाढ आणि नोकरी कायम करणे या मागण्यांसाठी हरियाणातील हिसार भागात सफाई कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ संप पुकारल्याने सफाई कर्मचाऱ्यावर पोलिसांकडून मारहाण झाल्याच्या निषेधार्थ पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय समोर या घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला. मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने करण्यात आली या संदर्भाचे निवेदन पुणे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आले. सदर आंदोलनामध्ये पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाचे अध्यक्ष रवीभाई परदेशी, महासचिव नरेश इंद्रसिंग जाधव, किशोर वाघेला, किशोर भेंडवाल, अर्जुनभाई सोलंकी,महेंद्र लालबिगे, सुरेश देडुंडा, गोपाल वाघमारे, कधीर पठाण, आदी उपस्थित होते.

# ओम श्री साईराम शिक्षक प्रतिष्ठानच्या वतीने 'गुणवंत शिक्षक व विद्यार्थी पुरस्कार सोहळा' उत्साहात

■ नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथे ओम श्री साई राम शिक्षक प्रतिष्ठान नारायणगावच्या वतीने जुन्नर तालुक्यातील विविध शाळेतील उपक्रमशील शिक्षकांना " गुणवंत शिक्षक पुरस्कार 2026" देऊन सन्मानित करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष शरदराव शिंदे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामोन्नती मंडळ नारायणगावचे सहकार्यवाह अरविंदभाऊ मेहेर, नारायणगाव आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी,उद्योजक सूर्यकांत विधाते,महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे राज्य संपर्कप्रमुख मंगेश मेहेर, साने गुरुजी कथामाला पुणे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कानडे, जुन्नर तालुका शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष रमाकांत कवडे, रविंद्र वाजगे, तालुका शिक्षक पतसंस्थेचे माजी



सभापती सचिन मुळे, खजिनदार अंबादास वामन, संचालक अविनाश शिंगोटे, जितेंद्र मोरे, कार्यलक्षी संचालक दत्ता हांडे, केंद्रप्रमुख दिनेश मेहेर, जिल्हा प्रतिनिधी सुनील हाडवळे, मनिषा कानडे सुशिला फुलसुंदर, राजश्री डोंगरे, सुरेखा बटवाल, निवृत्ती नाईक,मंदाकिनी शिंदे, जयश्री नाईक, अंजली सोमवंशी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, प्रतिष्ठानचे सर्व सभासद आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपक्रमशील, आदर्श व गुणवंत शिक्षक मिलिंद औटी, साईनाथ कनिंगध्वज, भारती अल्हाट, बबनराव सानप, बाळासाहेब शिंदे तसेच जिल्हा गुणवत्ता यादीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी कौस्तुभ कनिंगध्वज यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी व पुरस्कारार्थी शिक्षक साईनाथ कनिंगध्वज यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन सतिश वाव्हळ, बाळासाहेब राजगुरू,गणेश कवडे, रंगनाथ पवार, प्रदीप डोंगरे, ज्ञानेश्वर शिर्के, आनंद कोल्हे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक पतसंस्थेचे माजी उपसभापती मनोहर वायकर यांनी केले तर आभार प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष उर्मिला वाजगे यांनी मानले.

# संवेदनशील समुपदेशनाला यश; मिसिंग तरुणी अखेर सुरक्षितपणे आई-वडिलांच्या कुशीत

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील एका तरुणीने घरातील काही कारणांमुळे आई-वडिलांसोबत न राहता मैत्रिणीकडे राहणार असल्याचे सांगून घर सोडले होते. मुलगी घरी परत न आल्याने चिंताग्रस्त झालेल्या तिच्या वडिलांनी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे धाव घेऊन मुलगी मिसिंग असल्याची तक्रार दिली.त्यावरून बारामती शहर पोलीस स्टेशन येथे मानव मिसिंग नं. ११८/२०२६, दि. १०/०९/२०२६ अन्वये नोंद घेऊन तिचा तातडीने शोध सुरू करण्यात आला.

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील मिसिंग महिला व मुलींचा तातडीने शोध घेऊन त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रभावी कार्यवाही करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक श्री.संदीपसिंग गिल,मा. अपर पोलीस अधीक्षक श्री.गणेश बिरादार व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती शहर पोलीस स्टेशन येथे विशेष मिसिंग पथक कार्यरत करण्यात आले आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या समन्वयातून मिसिंग पथकातील महिला पोलीस हवालदार मोनिका मोहिते व महिला पोलीस हवालदार ज्योती डीसले यांनी तरुणीचा शोध घेण्यासाठी तातडीने विशेष प्रयत्न सुरू केले.उपलब्ध तांत्रिक तसेच मानवी माहितीच्या आधारे शोध घेतल्यानंतर सदर तरुणी सुरक्षितपणे मिळून आली.

मात्र पोलिसांसमोर केवळ मिसिंग तरुणीचा शोध घेण्याचे आव्हान नव्हते.ती घरातून का निघून गेली, तिच्या मनात नेमके काय सुरू होते, तिच्या निर्णयामागे अन्य कोणाचा प्रभाव होता का आणि ती सुरक्षित आहे का,या बाबींची वस्तुनिष्ठ पडताळणी करणेही तितकेच महत्त्वाचे होते.

महिला पोलीस हवालदार मोनिका मोहिते यांनी तरुणीला विश्वासात घेऊन अत्यंत संवेदनशीलतेने तिच्याशी संवाद साधला.तिला मानसिक व भावनिक आधार



देऊन कोणत्याही प्रकारचा दबाव न आणता तिची बाजू समजून घेतली.या संवादादरम्यान तरुणीने आपल्या आयुष्यातील काही गंभीर घटनांची माहिती पोलिसांना दिली. तरुणीच्या कथनानुसार,तिच्या कुटुंबीयांच्या ओळखीतील एका व्यक्तीने तिच्याशी जवळीक निर्माण करून तिला स्वतंत्र मोबाईल दिला होता.त्यानंतर फोन व व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क ठेवून तिचा विश्वास संपादन केला.पुढे त्याच्याकडे तिचे वैयक्तिक फोटो असल्याचे सांगून ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याचेही तिने सांगितले.

या परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करण्याच्या निमित्ताने दुसऱ्या एका तरुणाने आपण एका सामाजिक संघटनेचा पदाधिकारी असल्याचे सांगून तिच्याशी संपर्क वाढविला.तिच्या अडचणीत मदत व संरक्षण करण्याचा विश्वास दिल्यामुळे ती त्याच्यावर विश्वास ठेवू लागली. पुढे त्याने तिच्याशी प्रेम व्यक्त करून लग्न करण्याचे आश्वासन दिल्याची तसेच तिच्या भोळेपणाचा गैरफायदा घेतल्याची गंभीर बाबही तरुणीने चौकशीदरम्यान सांगितली.

सदर प्रकरणातील परिस्थिती, तरुणीचे कथन व उपलब्ध माहितीची सुसंगती तपासत असताना संबंधित तरुणीला तिच्या आई-वडिलांपासून व कुटुंबीयांपासून दूर ठेवण्यासाठी पूर्वनियोजित पद्धतीने स्वतंत्र व्यवस्था करण्याचा प्रयत्न होत असल्याची बाब प्रभारी पोलीस निरीक्षकांच्या निदर्शनास आली. तरुणीला कुटुंबापासून वेगळे करून स्वतंत्र खोलीमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यामागील नेमका हेतू काय होता, याबाबतही पोलिसांना संशय निर्माण झाला. या परिस्थितीचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी या बाबीकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले.

अधिक चौकशीत संबंधित संशयित तरुणाने स्वतःच्या मोबाईलमध्ये ChatGPT चा वापर करून सदर तरुणीच्या आई-वडील व नातेवाईकांविरोधात, त्यांच्यापासून तिला धोका असल्याच्या आशयाचा अर्ज तयार केल्याचे व तो अर्ज पोलीस स्टेशनमध्ये सादर करण्याची तयारी केल्याचे निदर्शनास आले. सदर अर्जामागील वस्तुस्थिती, त्यामागील हेतू तसेच तरुणीच्या निर्णयप्रक्रियेवर कोणाचा प्रभाव अथवा दबाव होता का, याची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची आवश्यकता असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे लक्षात येताच प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कोणताही घाईघाईने निष्कर्ष न काढता वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी महिला पोलीस अंमलदारांसह सामाजिक क्षेत्रातील जबाबदार व्यक्ती,ज्येष्ठ नागरिक व विधिज्ञ यांना पोलीस स्टेशन येथे पाचारण केले.त्यांच्या उपस्थितीत तरुणीची बाजू स्वतंत्रपणे व शांतपणे समजून घेण्यात आली तसेच स्वतःला सामाजिक संघटनेचा पदाधिकारी म्हणून सांगणाऱ्या संबंधित व्यक्तीकडूनही या सर्व बाबींबाबत स्पष्टीकरण घेण्यात आले. या संवाद व पडताळणी दरम्यान संबंधित व्यक्तीने तरुणीला दिलेली आश्वासने, तिला कुटुंबापासून दूर ठेवण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेली व्यवस्था आणि तिच्या आई-वडिलांविरोधात अर्ज तयार करण्याची बाब समोर आल्याने संपूर्ण घटनाक्रमातील गंभीर बाबी अधिक स्पष्ट झाल्या.त्यामुळे तरुणीने सांगितलेल्या बाबींचा स्वतंत्र जबाब नोंदवून उपलब्ध परिस्थिती व पुराव्यांचे कायदेशीर परीक्षण करून आवश्यक पुढील कार्यवाहीची तजवीज ठेवण्यात आली आहे.